|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : ४१ | सोमवार दि. १४ ऑक्टोंबर २०२४ ते रविवार दि. २० ऑक्टोंबर २०२४ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## अनैतिकसंबंधा समोर तिचे मातृत्व हरले प्रियकरासाठी आईने मुलाला ठार मारले

पुणे/क्राईम रिपोर्टर

शरीरसुखाला चटावलेल्या महिला आपल्या सुखासाठी कोणत्याही थराला जातात. यापूर्वीही अनेक घटनांमध्ये प्रियकरासाठी जन्मदात्या आईनेच आपल्या मुलांचा जीव घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. पुणे-नगर रस्त्यावरील लोणीकंद येथे अशाच एका घटनेत सुमित्रा लालसिंग ठाकूर या महिलेने आपले अनैतिसंबंध मुलाला समजल्याने तसेच यावरून भांडणे होऊ लागल्याने आईनेच प्रियकराच्या मदतीने मुलाच्या डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली. ...पान २ वर

# पत्नीवरील रागामुळे टोकाचे पाऊल टाकले निर्दयी बापाने दोन मुलींना नदीत फेकले







बुलढाणा/क्राईम रिपोर्टर

संसारात पती पत्नीमध्ये नेहमीच वाद होतात. अशावेळी दोघांनीही सामंजस्याची भूमिका घ्यायची असते, तरच संसारगाढा सुरळीत चालू शकतो. पण काही कुटुंबप्रमुख शीघ्रकोपी असतात. त्यातच घरात आर्थिक तंगी असेल तर त्यांचे टेन्शन अधिकच वाढलेले असते, अशावेळी पत्नी किंवा मुलांनी त्यांच्याकडे काही मागितले किंवा एखाद्या वस्तूसाठी हट्ट धरला तर त्या माणसाच्या रागाचा पारा आणखी चढतो आणि मग रागाच्या भरात त्याच्या हातून काहीही घडू शकते. खास करून ग्रामीण भागात जे मजूर म्हणून काम करतात त्यांची अवस्था खूप वाईट असते. कधी काम मिळते तर कधी मिळत नाही. त्यामुळे संसार चालवणे बायको मुलांच्या गरजा पूर्ण करणे त्याला अशक्य होते. अशावेळी नाईलाजाने कर्ज काढावे लागते आणि एकदा का कर्जाच्या ओझ्याखाली माणूस दबला कि त्याची मानसिक स्थिती आणखी बिघडते आणि मानसिक स्थिती बिघडलेला माणूस कधी काय करील याचा नेम नाही. कधी कधी असा माणूस बायकोवरचा राग मुलांवर काढतो आणि बायकोबरोबरच मुलानाही मारझोड करतो. जेंव्हा आर्थिक स्थिती हलाकीची बनलेली असते तेंव्हा माणसाला दारूचे व्यसन लागते. असा माणूस पूर्णपणे कोलमडून जातो. बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील लोणी कदमापूर येथील शेख हरून शेख शब्बीर हा वीटभट्टीवर काम करणारा मजूर होता. मात्र आर्थिक तंगीतून त्याचे घरात भांडण व्हायचे याच भांडणाला कंटाळून त्याने आपल्या २ लहान मुलीना नदीत फेकून त्यांची हत्या केली व आपले पाप लपवण्यासाठी मुली हरवल्याची मिसिंगची तक्रार पोलीस ठाण्यात दिली. मात्र चाणाक्ष पोलिसांनी त्याचा हा बनाव हाणून पडला आणि त्याला अटक केली तेंव्हा त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

बुलढाणा जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या पित्याने क्रूरतेचा कळस गाठला! पोटच्या दोन चिमुकल्या लेकींना पुलावरून नदीत फेकले. यामुळे दोन्ही निरागस बालिकांचा करुण अंत झाला. निष्ठुर पित्याच्या या टोकाच्या पावलाने बुलढाणा आणि अकोला जिल्ह्याचा सीमावर्ती परिसर हादरला आहे. खामगाव (जिल्हा बुलढाणा) ते बाळापूर (जिल्हा अकोला दरम्यान) दरम्यान काल रात्री उशीरापर्यंत हा भीषण घटनाक्रम घडला. बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव ग्रामीण, हिवरखेड आणि अकोला जिल्ह्यातील बाळापूर पोलिसांनी खाकीतील माणुसकी' दर्शन घडविले! पोलीस हद्द चा बाऊ न करता तिघांनी बाळापूर ते अकोला दरम्यानच्या नदीत बालिकांचा अथक शोध घेतला. अखेर शनिवारी ,५ ऑक्टोबरच्या रात्री दीड ते दोन वाजेदरम्यान दोन्ही बहिणींचे मृतदेह हाती लागले. प्रकरणी पित्यास खामगाव ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले असून, घरगुती वादातून त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक चौकशीत उघडकीस आले आहे. बाळापूर ते अकोला दरम्यान ...पान २ वर

## मुलांवरून झालेला वाद जीवघेणा ठरला चिडलेल्या पतीने पत्नीचा गळा चिरला





मिरा-भाईंदर/प्रतिनिधी

एक आई आपल्या मुलांसाठी काहीही करू शकते. कारण तिने त्या मुलांना जन्म दिलेला असतो. अशावेळी पती पत्नीमध्ये वाद असेल तर मुलांचा ताबा घेण्यावरून हा वाद कोर्टात जातो आणि तिथे निर्णय होतो. बांद्रा येथे राहणारी आम्रीन खान हिचा तिच्या पतीशी वाद होता. त्यामुळे ती वेगळी राहत होती, पण तिला आपल्या दोन्ही मुलांचा ताबा हवा होता. मात्र न्यायालयाच्या आदेशानंतरही पती मुलांचा ताबा देण्यास टाळाटाळ करीत होता. मुले आजीकडे गेल्याचे खोटेच सांगत होता. अखेर ती स्वतःच मीरा रोडला गेली. मात्र याची कुणकुण लागताच पतीने तिला रस्त्यात गाठले आणि तिची गळा चिरून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार मुलांचा ताबा घेण्याच्या प्रकरणावरून राग विकोपाला गेल्याने पतीने पत्नीची गळा चिरडून हत्या केल्याची घटना आहे. मीरारोडच्या नयानगर एन.एच. शाळेजवळ हा प्रकार घडला. तर आरोपीने पोलिसांकडे आत्मसमर्पण केल्याने ताब्यात घेत गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. मयत महिलेचे नाव अमरीन खान (वय ३६ वर्ष) असे असून ती बांद्रा येथील राहणारी रहिवाशी आहे. गेल्या दीड वर्षांपासून तिचे मीरारोड येथे राहणाऱ्या पती नदीम खान सोबत कौटुंबिक वाद सुरु होते. त्यांचा आपल्या दोन मुलांचा ताबा घेण्यासाठी न्यायालयात वाद सुरू होता. त्यानंतर ऑगस्ट महिन्यात न्यायालयाने मुलांचा ताबा हा आईला द्यावा असे आदेश दिले. मात्र, तरीही पतीकडून ताबा मिळत नव्हता. पुन्हा न्यायालयात जाऊन त्या महिलेनी दाद मागितली. तेव्हा पोलीस संरक्षणात १२ वर्षांची मुलगी आणि २ वर्षाचा मुलगा यांचा ताब्यात घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार मीरा-भाईंदरचे पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या आदेशानुसार एक महिला व एक पुरुष असे दोन कर्मचारी देण्यात आले होते. त्यासाठी नया नगर पोलीस ठाण्यात सात हजार रुपये भरण्यात आले होते. मात्र ते ज्यावेळी नवऱ्याच्या घरी गेले, तेव्हा मुले नाहीत असे सांगितले. ते आपल्या आजीसोबत राजस्थान येथील अजमेर दर्गा येथे गेल्याचे त्याने सांगितले. तेव्हा ते परतून आले. मात्र मुलीची परीक्षा असल्याने मुलगा आणि मुलगी इथेच असल्याचा मयत महिलेला संशय आल्याने दुसऱ्या दिवशी तिने एन.एच. शाळेत जाऊन चौकशी करण्याचे ठरविले. त्याच दरम्यान आरोपी नदीम खान (वय ४१ वर्ष अंदाजे) याने त्याच्या पत्नीला रस्त्यात गाठून चाकूने गळ्यावर सपासप ...पान २ वर

## जमिनीच्या वादात दिराने हल्ला केला उज्वला सोबत वैशालीचाही जीव गेला

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर



कुटुंबातील आर्थिक वाद लवकर मिटले नाहीत तर त्यातून जी सुडाची भावना निर्माण होते, त्यात एखाद्याचा जीव जाऊ शकतो. त्याचबरोबर अशा कौटुंबिक वादात सहसा कुणी पडू नये. कदाचित त्यालाही परिणाम भोगावे लागतात. अकोले तालुक्यातील बेलापूरमध्ये रहाणाऱ्या दत्तात्रय फापाळे याचे तिच्या विधवा वाहिनीशी शेतीतील उत्पन्नावरून वाद होता. याच वादातून एके दिवशी दोघांमध्ये वाद झाला. यावेळी संतापलेल्या दिराने रागाच्या भरात वाहिनीवर कोयत्याने वार केले. यावेळी तिच्या सोबत असलेली वैशाली तिच्या मदतीला आली, तर तिच्यावरही दत्तात्रयने वार केले. या हल्ल्यात दोघींचाही मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

अकोले तालुक्यातील बेलापूर येथे दत्तात्रय प्रकाश फापाळे हे रहायला आहेत. वयाच्या ५०शीत ही ते अविवाहित आहेत. त्याचा लहान भाऊ अशोक फापाळे याचे लग्न आळंदी येथील उज्वलाशील झाले होते. त्यांना लहान दोन मुले ही आहेत. ...पान २ वर

## जामिनावर सुटलेला खुनी रस्त्यात भेटला अभिजीतच्या मित्रांनी खुनाचा बदला घेतला

निपाणी/क्राईम रिपोर्टर



जे लोक शस्त्राच्या बळावर दादागिरी करून जगतात, ते लोक एक तर पोलिसांच्या हातून मरतात किंवा शत्रूच्या हातून मारले जातात. निपाणीमध्ये रहाणाऱ्या अश्रफअली या दाखलेबाज गुंडाची सुद्धा तीच अवस्था झाली. त्याच्यावर अनेक गंभीर गुन्ह्याची नोंद होती. त्याने टोळी बनवून खंडणी वसुली सुरु केली होती. दहशतीच्या जोरावर त्याने एका निरअपराधाची हत्या केली होती. त्या प्रकरणात त्याला अटक झाली. मात्र जामिनावर सुटून येताच ज्याची त्याने हत्या केली होती त्याच्या मित्रांनी अश्रफअली याला ठार मारून बदला घेतला. या प्रकरणी सर्व आरोपींना अटक झाली आहे.



निपाणी शहरातील दावणमलीक दर्ग्यानजीक राहणारा अशरफअली हा पोलीस रेकॉर्डवरील आंतरराज्य सराईत गुन्हेगार म्हणून ओळखला जात होता. तो नावालाच फॅब्रिकेटरचा व्यवसाय करीत होता. वयाच्या १५ ते १६ वर्षापासून लोकांना दादागिरी करीत त्याने शहरात आपली दशहत निर्माण केलेली होती. धमकी देणे, मारामाऱ्या करणे हे त्याच्या अंगवळणीच पडले होते. महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली जिल्हयातील गुन्हेगारांशी त्याचे लागेबांधे निर्माण झालेले होते. कमी वयात त्याने आपला दबदबा निर्माण केल्याने घाबरून लोक त्याला भाई दादा म्हणत होते.सामान्य माणुस कधी त्याच्या नादाला लागत नव्हता. त्याने शहरात अशी काही दशहत निर्माण केली होती की,त्याच्या अगोदर ...पान २ वर



## कुटुंबातील वाद मिटवायला गेला भावांच्या हातून तिसरा भाऊ मेला

सोलापूर/क्राईम रिपोर्टर

आजकाल कौटुंबिक वाद इतके विकोपाला जातात कि कुटुंबातील माणसांना रक्ताच्या नात्याचाही विसर पडतो. सोलापूरच्या मंगळवेढा येथे घराच्या वाटणीवरून झालेला वाद सोडवणे एका इसमाला चांगलेच महागात पडले. कारण वाद मिटवण्यासाठी गेलेल्या शहाजहान शेख याला त्याच्याच दोन सख्ख्या भावांनी आपल्या पत्नी आणि मुलांच्या मदतीने ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

घर जागेच्या वादातून तीन भावांमध्ये झालेले भांडण मिटविणे थोरल्या भावाच्या जीवावर बेतले. भांडणाचे पर्यवसान त्याच्या हत्येत झाले. थोरला मंगळवेढा तालीमजवळ सकाळी झालेल्या या घटनेप्रकरणी पोलिसांनी मृताच्या भाऊ आणि भावजयीसह सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यापैकी चौघांना अटक होऊन पोलीस कोठडीत ठेवण्यात आले आहे. शहाजहान गुलहमीद शेख (वय ५३) असे खून झालेल्याचे नाव आहे. त्याचा मुलगा सलीम शेख याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात याबाबत दिलेल्या फिर्यादीनुसार मृत शहाजहान याचे भाऊ शाबीर गुलहमीद शेख (वय ४५), समीर गुलहमीद शेख (वय ४०) यांच्यासह भावजय मेहरून शाबीर शेख, रेहाना समीर शेख, पुतणे सुफियान साबीर शेख, साकिब शेख या सहाजणांची नावे आरोपी म्हणून निष्पन्न ...पान २ वर

## सरपंचबाईवरचा राग मुलावर काढला दिवसाढवळ्या त्याचा मुडदा पाडला



मयत निलेश

छ. संभाजीनगर/क्राईम रिपोर्टर

महिलांनी मोठ्या पदावर जाणे हे काही पुरुषांना आवडत नाही. त्यामुळे त्यांच्यातील पुरुषी अहंकार जागा होतो आणि मग तो मोठ्या पदावर पोहचलेल्या त्या महिलेला त्रास द्यायला सुरुवात करतो. संभाजी नगरातील करंजखेडमध्ये संगीताबाई सोनावणे हि महिला सरपंचपदी निवडून आली. मात्र तिने ज्याला पराभूत केले त्या भगवान कोळेचा तिच्याविरुद्ध जळफळाट झाला. त्यानंतर त्याने तिला त्रास द्यायला सुरुवात केली आणि एकेदिवशी तिच्यावरचा राग तिच्या मुलावर काढून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे.



पिशोर कन्नड तालुक्यातील पिशोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील करंजखेड त्या गावामध्ये निलेश सोनवणे हा आई-वडीलांसोबत रहातो. नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये निलेशची आई संगीताबाई सोनवणे यांनी राखीव प्रवर्गातून बाजी मारत सरपंचपदाचा बहुमान पटकावला. यादरम्यान त्यांनी विरोधक पॅनलच्या उमेदवाराचा पराभव केला. आपल्या उमेदवाराचा झालेला दारूण पराभव त्या पॅनेलचा प्रमुख भगवान कोल्हे यांच्या जिव्हारी लागला होता. ते काही या पराभवातून सावरले गेले नव्हते. या पराभवाचा वचपा काढण्यासाठी ते नेहमी सरपंच संगीताबाई सोनवणे यांच्यासोबत वाद घालत होते, तसेच त्यांच्या कुटुंबीयांना त्रास देण्याचा त्यांनी सपाटा सुरू केला होता. सरपंच आणि त्यांचे कुटुंबीय या व्यक्तीच्या वर्तनामुळे अधिकच वैतागले होते, पण सरपंच संगीताबाई नेहमीच जपून रहात होत्या. ...पान २ वर

## प्रेमाच्या त्रिकोणात 'एक फूल दो माली' दगाबाज प्रेयसीची प्रियकराने हत्या केली



भुसावळ/क्राईम रिपोर्टर

चंचल महिलेचा पाय कधीच एका ठीकाण्यावर नसतो. त्यामुळे ती एकाशीच प्रामाणिक राहत नाही आणि जेंव्हा एखादी महिला पुरुषाचा विश्वासघात करते तेंव्हा तो पुरुष सुडाने पेटतो अशावेळी त्याच्या हातून काहीही घडू शकते. भुसावळ तालुक्यातील साकेगावमध्ये राहणारी करिष्मा नाव बदलले ही तीन मुलाची आई होती, तरीही तिचे गावातीलच धर्मेंद्रशी काल्पनिक नाव अनैतिक संबंध होते हे संबंध पुढे इतके वाढले कि तिने त्याचे नियोजित लग्नही मोडून टाकले. दरम्यान धर्मेंद्रशी संबंध असताना तिने जीतेंद्रशी काल्पनिक नाव सुत जुळवले याचा धर्मेंद्रला राग आला आणि रागाच्या भरात त्याने करीश्माचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

करिश्मा (काल्पनिक नाव) तारुण्यात येताचतिच्या आई वडीलांनी तिच्यासाठी योग्य स्थळ बघण्यास सुरुवात केली. भुसावळ तालुक्याच्या एका गावातीलउपवर तरुणाचे स्थळ ...पान ६ वर

## दोन यारांमध्ये भाग्यश्रीचा कोंडमारा झाला दुसऱ्याच्या मदतीने पहिल्याचा खून केला

बेळगावी (रायबाग)/क्राईम रिपोर्टर



विधवा बाई फार काळ पुरुषाच्या सहवासा शिवाय राहू शकत नाही. तिची जवानी तिला स्वस्थ बसू देत नाही. रायबाग येथे राहणाऱ्या भाग्यश्रीचेही तसेच झाले होते. त्यामुळे तिने शरणाप्पा नावाच्या इसमाला पटवले. शरणाप्पा मजूर होता, पण त्याने आपण उस उत्पादक असल्याचे सांगितले. त्यामुळे भाग्यश्री भुलली पण नंतर तिला शरणाप्पाची असलीयत समजताच इब्राहीमसाब नावाचा दुसरा प्रियकर गाठला, पण शरणाप्पा तिला सोडायला तयार नव्हता. तिचे अश्लील फोटो दाखवून तिला ब्लॅकमेल करीत होता. अखेर तिने आपल्या दुसऱ्या प्रियकराच्या मदतीने शरणाप्पाचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

भाग्यश्री डोनी हिचा पती हणमंत डोनी याचे गेल्या चार पाच वर्षापूर्वी निधन झाले. पती गेल्याने तिच्या घरची परिस्थीती तशी बेताचीच बनली होती. त्या परिस्थीतीने ती बेजार झालेली होती. आपल्याकडे सौदर्य आणि जवानी असून काय उपयोग असे तिला वाटत होते. तिला तीन मुले असल्याने ती कसेबसे आपल्या तीन मुलांच्याकडे बघून जीवन जगत होती. ऐन तारूण्यात तिच्या पतीचे निधन झाल्याने तिला तिची जवानी स्वस्थ बसु देत नव्हती. या जवानीचा उपयोग करून घेण्याचे तिने ठरविले. तिला तिची ती गरज स्वस्थ बसु देत नव्हती. दिवस कसा तरी जात होता, परंतु रात्र तिला खात होती. तिला एका जीवन साथीची गरज होती. तशी ती सुशिक्षीत आणि देखणी असल्याने बाहेरच्या जगाची तिला थोडी फार ओळख होती. आपल्या मोबाईलवरून ती फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप चालवित होती. सोशल मिडियावरील ओळख झालेल्या ...पान ६ वर

14 TO 20 OCTOBER 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 10/12/2024 8:44 PM Page 1



पान १ वरून...

## अनैतिकसंबंधा समोर तिचे मातृत्व ...

या प्रकरणी आरोपी आईला पोलिसांनी अटक केली आहे, तर तिचा प्रियकर फरार आहे. अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या तरुणाच्या डोक्यात दगड घालून खून करण्यात आल्याची घटना नगर रस्त्यावरील लोणीकंद भागात घडली. याप्रकरणी तरुणाच्या आईसह प्रियकराला अटक करण्यात आली. अनिल लालसिंग ठाकूर (वय ३०) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी अनिलची आई सुमित्रा लालसिंग ठाकूर (वय ५५, रा. वाघमारे वस्ती, पेरणे फाटा, नगर रस्ता) हिला अटक करण्यात आली. याप्रकरणी सुमित्राचा प्रियकर प्रफुल्ल पुंडलिक ताथोड (वय ३४, रा. वाघमारे वस्ती, पेरणे फाटा, नगर रस्ता) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताथोड पसार झाला आहे. अनिलचा भाऊ सुनील ठाकूर (वय ३२) याने याबाबत लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सुमित्रा आणि तिची मुले अनिल, सुनील मूळचे उत्तर प्रदेशातील आहेत. ते मजूरी करतात. पेरणे फाटा परिसरातील वाघमारे वस्ती भागात ते राहायला आहेत. या भागात राहणाऱ्या आरोपी प्रफुल्लशी सुमित्राचे अनैतिक संबंध होते. अनैतिक संबंधाची कुणकुण अनिलला लागल्याने त्याची आई सुमित्राशी भांडण झाले होते. बुधवारी मध्यरात्री सुमित्रा, तिचा प्रियकर प्रफुल्ल यांच्याशी अनिलचा वाद झाला. त्यावेळी प्रफुल्ल आणि सुमित्रा यांनी अनिलला शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यांनी त्याच्या डोक्यात दगड घातला. गंभीर जखमी झालेल्या अनिलला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंडीत रेजीतवाड यांनी घटनास्थळी धाव घेतली. सुमित्राला अटक करण्यात आली असून, आरोपी प्रफुल्ल पसार झाला आहे. सहायक पोलीस निरीक्षक घोरपडे तपास करत आहेत. शहरात महिनाभरात अनैतिक संबंधातून तीन खून झाले आहेत. कर्वेनगर भागात अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा महिलेने प्रियकराशी संगनमत करुन त्याचा खून केला होता. महिलेने पतीला जेवणातून झोपेच्या गोळ्या दिल्या होत्या. झोपेत असलेल्या पतीवर प्रियकराने तीक्ष्ण शस्त्राने वार केले होते. कात्रज भागात अनैतिक संबंधातून महिलेने प्रियकराशी संगनमत करुन पतीचा खून केला होता. पतीने आत्महत्या केल्याचा बनाव त्यांनी रचला होता. तपासात पतीचा गळा दाबून खून करण्यात आल्याचे उघडकीस आले होते. महिलेसह प्रियकारला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. त्यानंतर लोणीकंद भागातील पेरणे फाटा परिसरात अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या मुलाचा आई आणि तिच्या प्रियकराने खून केल्याची घटना बुधवारी मध्यरात्री घडली.

## पत्नीवरील रागामुळे टोकाचे पाऊल...

ही जनमानस सुन्न करणारी भीषण घटना घडली आहे. मात्र आरोपी बुलढाणा जिल्ह्यातील जिल्ह्यातील लोणी कदमापूर या गावातील रहिवासी आहे.तसेच आपल्या मुलींची क्रूर हत्या करण्यासाठी त्यांनी अटाळी (तालुका खामगाव) मधून बाळापूर कडे नेले.यामुळे तपास खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आल्याचे वरिष्ठ पोलीस सूत्रांनी स्पष्ट केले. बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील लाखनवाडा नजिक असलेल्या लोणी कदमापूर येथील आरोपी पित्याचे नाव शेख हारून शेख शब्बीर असे आहे. निर्दयी बापानेच सात वर्षीय कुमारी सदफ व नऊ वर्षीय कुमारी आलिया या दोघा चिमुकल्या बहिणींना बाळापूर (जिल्हा अकोला) नजीकच्या नदीत फेकले. बाळापुर ते अकोला या राष्ट्रीय महामार्गावरील विटांच्या भट्ट्या असलेल्या परिसरात हे कृत्य केले. त्यापूर्वीकदमापूर येथील शेख हारून शेख शब्बीर यांनी दोन्ही मुली बेपत्ता झाल्याची तक्रार शनिवारी (दिनांक ५) संध्याकाळी पोलिसात दिली होती. आपण दोन्ही मुलींना अटाळी येथून ऑटो रिक्षात बसवून दिले होते अशी बनवाबनवी करण्याचा त्याने प्रयत्न केला. मात्र चाणाक्ष पोलिसांना संशय आल्याने आणि त्याच्या बोलण्यात विसंगती असल्याने त्यांनी शेख हारून यावरच शंका आली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्यानंतर खाक्या दाखवताच त्यानेच आपल्या कृत्याची कबुली दिली. आपल्या मुलींचे मृतदेह नदीत फेकल्याची माहिती पोलिसांना दिली आहे. त्याने दिलेल्या माहितीवरून बाळापुर येथील बायपास'वरील नदीमध्ये दोन्ही मुलींचा मृत्यू शोधण्यासाठी खामगाव ग्रामीण,हिवरखेड व अकोला पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहे.

## मुलांवरून झालेला वाद जीवघेणा...

वार करत हत्या केली आहे. याबाबत पुढील तपास सुरु जात असल्याची माहिती उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिली आहे.

## जमिनीच्या वादात दिराने हल्ला केला...

दत्तात्रय याचे लग्न झाले नसल्याने ते खायला प्यायला अशोक याच्या घरीच होते. तसे त्याचे एकत्र कुटूंब असल्याने संपुर्ण व्यवहार हा दत्तात्रय हेच पाहत होते. घरची ५० गुठें शेती असून त्या शेतात दोघे मिळून सोयाबीनचे आणि इतर पीक काढत होते. अशोकच्या लग्नाला आठ दहा वर्ष झाली असतील त्यातच गेल्या दीड दोन वर्षापूर्वी त्याचे आजाराने निधन झाले. अशोक याचे निधन झाल्याने त्याच्या दशविधी कार्यक्रमाचा सगळा खर्च हा मोठा भाऊ या नात्याने दत्तात्रय यांनी केला होता. त्यांना या कार्यक्रमाचा जवळ पास ५० हजार रूपये सतका खर्च आलेला होता. तो खर्च त्यांनी आपल्या वहीत लिहून ठेवलेला होता. त्यातच अशोक याची पत्नी उज्वला ही पतीच्या निधनानंतर आपले माहेर आळंदी येथे दोन्ही मुलांना घेऊन राहयला गेली. त्यामुळे दत्तात्रय याच्या जेवणाची खाण्याची आबाळ होऊ लागली होती. त्यातच त्याचा स्वभाव हा चिडखोर आणि रागीक्ष होता. गेल्या वर्षाभरापासून ५० गुठें शेतीचा हिशोब आणि खर्च उज्वला या पाहत होत्या. शेतीच्या कामासाठी त्या आळंदी येथून बेलापुरला दोन तीन दिवसासाठी येत होत्या. उज्वला या शेतीचा हिशोब पाहत असल्याने दत्तात्रय हे तिच्यावर चिडून होते. कारण उज्वला यांनी त्यांना शेतीतील सोयाबीन आणि कडधान्य विकून ही पैसे दिलेले नव्हते. मी घरचा कर्ता पुरूष माझ्याकडे कारभार असताना लहान भावाची बायको शेतातील पीकांचे उत्पन्न घेऊन जाते म्हणजे काय? याचा त्यांना राग आलेला होता. त्यातच अजून घराची आणि ५० गुठें शेतीची रितसर वाटणी ही झालेली नव्हती. या कारणातून त्याचे भावजेय उज्वला हिच्याबरोबर भांडण होत होते. ते तिला तुझ्या नवऱ्याच्या दशक्रियेला घातलेले ५० हजार आणि शेतीच्या उत्पन्नातील ५० हजार रूपये दे. तुझ्या तुझ्या वाटणीचे पैसे तु ठेवून घे असे सांगत होते.ती हल्ली बेलापूर येथे राहत नसल्याने दत्तात्रय हे दारू पिऊन तिच्याशी भांडणासाठी आळंदी येथे जावू लागले होते. त्यामुळे उज्वलाने आपल्या माहेरच्या मंडळीना विश्वासात घेऊन दत्तात्रय याला तेथून हाकलून देत तु माझ्या नवऱ्याच्या दशक्रियेचा खर्च एवढा कसा काय दाखवतोस. तो खर्च कमीत कमी २० हजार रूपये झालेला असताना तुम्ही मला ५० हजार रूपये कसे काय मागता असे म्हणत त्याच्याशी भांडण काढून त्यांना तेथून हाकलून लावलेले होते. याचा राग दत्तात्रय याला आलेला होता. त्यावेळी दत्तात्रय यांनी तेथून माघार घेत परत बेलापुरला येत आता हिला माझ्या घरीच काय माझ्या गावात बेलापूरला ही पाय ठेवू देणार नाही असे मनात ठरविले.ती फक्त बेलापूरला येण्याचे ते वाट पाहत होते.घरातील मोठा कर्ता पुरूष मी. अजून घराची वाटणी झालेली नाही, शेतीची वाटणी झालेली नाही मग ही शेतातील सगळया पीकाचे पैसे कसे काय घेऊन जाते याचा त्यांना राग आलेला होता. फापाळे याचे पै-पाहुणे ही मयत अशोक याची पत्नी उज्वला हिच्याबाजूनेच बोलत होते. तिने जवळच्या पै-पाहुण्यांना दीर दत्तात्रय याने फसगत केल्याचे सांगून त्याच्या विषयी पै-पाहुणांत आणि शेजाऱ्यात गैरसमज निर्माण केलेला होता. याचा ही राग दत्तात्रय यांना होता. हल्ली ते या विचाराने जास्तच दारू पित होते. तसे त्यांना तु का दारू पितोस म्हणून विचारणारे ही कुणी नव्हते. त्यांना रान मोकळेच होते. भावजेय उज्वला ही मनमानी करत आहे हे त्यांना माहित होते. सगळा कारभार परस्पर तिने आपल्या हातात घेतला असल्याने त्याच्या हातात पैसे येत नव्हते. त्यातच त्यांना हल्ली मोलमजुरी करण्यासाठी बाहेर जावे लागल्याने हिच्यामुळे आपल्यावर ही वेळ आली आहे याचा त्यांना पश्ताप होत होता. दिवस रात्र दारू पिऊन येवून घरात झोपायचे ना आगे ना पिच्छे. तिने तर उलट त्याचीच बदनामी सगळ्या पै-पाहुण्यात केलेली होती. त्यामुळे त्यांना कुठे तोंड दाखवायला ही जागा राहिलेली नव्हती. याचा सगळा राग दत्तात्रय याला आलेले होता. तो आता भावजेय उज्वला ही बेलापुरला येण्याची वाट पाहत होता. गेल्या पंधरा दिवसापूर्वी तिने शेतातील सोयाबीन विकले असल्याने त्याचे पैसे घ्यायला ती येणार हे त्याला माहित होते. त्यामुळे तो सतर्क झाला होता.गेल्या ४ ऑक्टोंबरला उज्वला ही बेलापूरला आली. दोन दिवस ती राहिली. त्याचवेळी उज्वलाच्या भावकीतील वैशाली फापाळे ही बेलापूरला चार दिवसासाठी आलेली होती.त्याच दरम्यान दत्तात्रय हा दोन तीन दिवसामध्ये उज्वलाबरोबर भावाच्या दशविधीला झालेला खर्च ५० हजार रूपये दे आणि सोयाबीनचे ही पैसे दे म्हणून मागे लागलेला होता. तिच्याबरोबर या कारणातून भांडण काढून तिला मारायला ही जात होता. तो रागीट आणि चिडखोर हे भावजेय उज्वला हिला चांगले माहित होते. परंतु तुम्ही खोटा का हिशोब सांगता, हिशोब खोटा सांगून तुम्ही माझ्याकडून जास्तीचे पैसे मागून राहिलात असे म्हणून तुम्ही आधी वाटणी करा मग माझ्याकडे पैसे मागा असे ती त्यांना सांगत होती. दोघांचा वाद विकोपाला गेला होता. सोमवार दि.७ ऑक्टोंबर रोजी दुपारी २.३० दरम्यान दत्तात्रय हा घराकडे दारूच्या नशेतच आला. दारूच्या नशेत तो भावजेय उज्वला हिला शिव्या देत तिला भावाच्या दशक्रियेच्या विधीचे ५० हजार रूपये दे नाही तर घरातून बाहेर पड असे म्हणत होता. तो बाजारपेठेतील घरासमोर उभा राहून तो तिला शिव्या देत भांडण उकरून काढत होता. त्याचेवळी घरात भावजेय उज्वला बरोबर तिच्या भावकीतील वैशाली फापाळे या देखील होत्या.दतात्रय हा शिव्या देत असताना त्या दोघी बाहेर आल्या. त्याच वेळी दत्तात्रय याला उज्वलाला बघून जास्तच चवताळला होता. बाहेर येवून उज्वला ही त्याला उलट शिव्या देत होती. याचा राग दत्तात्रयला आला.शिव्या देत असणाऱ्या उज्वलावर त्याने आपल्याकडील कोयत्याने तिच्या मानेवर, हातावर आणि डोक्यावर सपासप वार केले. तिच्यावर वार होत असताना भावकीतील वैशाली ही उज्वला हिला सोडायला आली. तिच्यावर ही दत्तात्रय याने त्याच कोयत्याने वार केले. ती ही त्या वारात गंभीर जखमी झाली होती. दोघी ही गंभीर रित्या जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात ओरडत पडल्या. त्याच्या ओरडण्याने रस्त्यावरचे जाणारे येणारे लोक आणि त्याच्या शेजारी राहणारे डॉक्टर धावत तेथे आले. त्या डॉक्टरांना बघून दत्तात्रय हा आपल्याकडील रक्ताळलेला कोयता दाखवित त्यांना धमकावत तेथून जंगलाच्या दिशेने पळून गेला. त्या डॉक्टरांनी त्या दोघींनी जवळच्या एका खाजगी वाहनातून उपचारासाठी नेले. परंतु तेथील उपचारापूर्वीच त्या दोघींचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांना सांगितले.

या घटनेत भावकीतील वैशाली फापाळे या भांडण सोडवायला आल्या, त्या नीरस मनाने उज्वला यांना सोडवायला मध्यस्थी करायला गेल्या परंतु त्याच्यावर ही प्राण घातक वार झाल्याने त्याचा ही मृत्यू झाला. या घटनेची माहिती अकोले पोलीसांना मिळाल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अमहदनगर जिल्यात या दुहेरी खूनाच्या घटनेने खळबळ उडाली होती. पोलीसांना घटनास्थळी श्वान पथकाला आणि फॉरेनिक्स लॅबला पाचारण करून तपास चालविला. श्वान पथक हे थोडया अंतरावर जाऊन घुटमळले. घटनास्थळी वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेऊन पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना केल्या. पळून गेलेल्या दत्तात्रय फापाळे याच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषणचे दोन पथके तयार करण्यात आली. पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून दोन्ही मृतदेहाचे शवविच्छेदन अकोले येथील सरकारी रुग्णालयात केले. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे आणि यातील संशयीत आरोपी कोण आहे याची माहिती पोलीसांना मिळाली होती. स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस या घटनेचा तपास करीत असताना संशयीत दतात्रय फापाळे हा त्याच्या शेतातील घरात पोलीसांना मिळून आला. त्याला ताब्यात घेऊन अकोले पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत सुरूवातीला तो पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविला असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी या घटनेची फिर्याद मयत उज्वला हिच्या भावाकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीसांनी उज्वला अशोक फापाळे (वय ३८) आणि वैशाली संदीप फापाळे (वय ४०) याच्या खून प्रकरणी दत्तात्रय प्रकाश फापाळे (वय ५०) रा.बेलापूर तालुका अकोले याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.मोहन बोरसे याच्या मार्गदर्शनाखाली अकोले पोलीस करीत आहेत.

## सरपंचबाईवरचा राग मुलावर काढला...

गावात वाद नको आणि या वादातून काही विपरित घटना घडू नये म्हणून त्या नेहमीच अलिप्त रहाण्याचा प्रयत्न करत होत्या, यासाठी त्यांनी पती आणि मुलगा यांनाही कोणताही वाद न करण्याची विनंती केली होती. दुसरीकडे मात्र भगवान कोल्हे किरकोळ कारणाने संगीताबाई सोनवणे यांच्यासोबत वाद घालत होते. दोन वर्षापूर्वी पुन्हा एकदा यांच्यात वादाची ठिणगी पडली. सरपंच या नात्याने संगीताबाई सोनवणे यांनी गावातील यात्रेत नारळ फोडण्याचा मान मिळवला होता, मात्र यावरून भगवान कोल्हे यांनी वाद उकरून काढल्यामुळे ऐन कार्यक्रमात हमरी-तुमरीचे प्रकरण घडले होते, मात्र याकडे दुर्लक्ष करत सोनवणे यांनी नव्याने काम सुरू करण्याचा प्रयत्न केला, तरीही भगवान कोल्हे ऑणि त्यांचे समर्थक सरपंचांना विविध कामात अडचण निर्माण करतच होते. अखेर सरपंच सोनवणे यांनी पोलीस ठाण्यात चौघांविरूद्ध गुन्हा दाखल केला होता. आपल्या उमेदवाराचा पराभव आणि पोलीस ठाण्यातआपल्याविरूद्ध दिलेली तक्रार या गोष्टीमुळे आता कोल्हे अधिकच अस्वस्थ झाले होते. सोनवणे आणि कोल्हे यांच्यातील वाद दिवसेंदिवस जास्तच धुमसत चालला होता. सरपंच पुत्र निलेश कैलास सोनवणे एकटाच करंजखेड शिवारातील शेतामध्ये आल्याची माहिती भगवान कोल्हे यांना मिळाली होती. त्यानंतर काही वेळातच मयूर वाघ आणि सुभाष साळुंखे हे सोनवणे यांच्या शेताच्या दिशेने भरधाव वेगाने निघाले. आज कुठल्याही परिस्थितीत निलेशचा काटा काढायचा हाच मनोमन विचार या दोघांनी केला होता. निलेश शेतातील गुरा-ढोरांना चारा-पाणी करण्यासाठी गेला होता. बांधावर गाडी लावून तो-गुरांना चारा टाकण्याच्या तयारीत होता. तितक्यात मयूर आणि सुभाष तिथे पोहचले, त्या दोघांना पहाताच निलेश थबकला, मात्र त्याने या दोघांकडे दुर्लक्ष करत आपले काम सुरूच ठेवले. निलेशला पहाताच या दोघांच्या तळपायाची आग मस्तकात गेली होती. ते सरळ त्याच्यावर चालून आले. धारदार शस्त्राने त्यांनी निलेशच्या अंगावर सपासप वार करण्यास सुरूवात केली. त्या दोघांनी धारदार शस्त्राने निलेश सोनवणेवर जवळपास २२ वेळा वार केल्यामुळे निलेशला त्यांच्या तावडीतून सुटण्याची संधीच मिळाली नाही. तो सुटकाकरून घेण्यासाठी याचना करू लागला होता, मात्र सुडाच्या भावनेने पेटलेले मारेकरी त्याच्यावर तुटून पडले होते. त्यांनी अत्यंत निर्दयीपणे सपासप वार केले होते. निलेश रक्ताच्या थारोळ्यात मक्याच्या शेतात पडला होता. मदतीसाठी धडपडणारे निलेशचे शरीर शांत पडले होते. तो ठार झाल्याचे लक्षात येताच मारेकऱ्यांनी त्या परिसरातून काढता पाय घेतला. दुसरीकडे निलेश बराच वेळ झाला तरी शेतातून परतला नाही म्हणून त्याची आई संगीताबाई सोनवणे यांना रूखरूख वाटू लागली. त्यांनी आपले पती कैलास यांच्यासोबत शेताकडे धाव घेतली. ते शेतात निघाले, असता त्यांना मयूर वाघ, सुभाष साळुंखे आणि गावातील इतर चौघे जण येतांना दिसल्यामुळे या चार जणांनी आपल्या मुलाचा घात केल्याचा संशय संगीताबाई सोनवणे यांना आला. दरम्यान त्यांना एका महिलेने निलेशची गाडी बांधावर पडली असल्याचे सांगितले. हे ऐकताच संगीताबाई सोनवणे यांच्या पायाखालची जमीन सरकली. या चौघांनी निश्चितपणे आपल्या मुलाला घात केला आहे, या संशयाने त्या वेगाने शिवाराकडे निघाल्या. शिवारात पोहोचताच त्यांनी निलेशला आवाज देण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना निलेशकडून काहीच प्रतिसाद येत नसल्यामुळे ते दोघेही पती- पत्नी अधिकच चिंताग्रस्त झाले होते.

दरम्यान मक्याच्या शेतातून चार-पाच जणांच्या चालण्यामुळे तयार झालेल्या पायवाटेकडे या दोघांचे लक्ष गेले आणि त्यांनी त्या दिशेने धाव घेतली, तेंव्हा समोर रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मुलगा निलेशला पहातच या दोघांच्या काळजाचा ठोका चुकला. निलेश निपचित पडला ई होता. त्याची काहीच हालचाल होत नव्हती. त्या चार जणांनीच त्याचा घात केला आहे असे म्हणत संगीताबाई जोरजोरात आक्रोश करू लागली. त्या आणि त्यांच्या पतीने आरडाओरडा करून परिसरांत असलेल्या शेतकऱ्यांना बोलावून घेतले. काही शेतकरी त्यांच्या मदतीला धावून आले. त्यांनी लगेच निलेशला दवाखान्यात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी केलेल्या वैद्यकीय तपासणीत निलेशच्या मृत्यू झाल्याचे समोर आले. या घटनेने एकच खळबळ माजली. मयताची आई संगीताबाई कैलास सोनवणे या करंजखेड येथे सरपंच पदावर कार्यरत असून यांच्या मुलाचा खून झाल्याची तक्रार त्यांनी पिशोर पोलीस ठाण्यात येऊन दिली. तक्रारीत म्हटले की, करंजखेड येथे सरपंचपद हे राखीव असल्याने मी सरपंचपदी नियुक्ती झाले, तेंव्हा आमच्या गावातील भगवान काशीराम कोल्हे यांना राग आला होता, कारण मी त्यांच्या उमेदवाराला पराभूत करून निवडून आले होते. त्यांच्या मनात राग होता. त्या रागातून ते मला व माझ्या परिवाराला वारंवार त्रास देत होते. २०२२ मध्ये यात्रेमध्ये नारळ फोडण्यावरून झालेल्या वादात भगवान. कोल्हे व इतरांनी जातीवाचक शिवीगाळ केल्याने मी पिशोर पोलीस ठाण्यात त्यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला होता. दि. २५ जुलै २४ रोजी माझा मुलगा आकाश संभाजीनगरवरून गावाकडे आला होता. तो त्याच्या मित्राला मोटरसायकलवरून सोडून येत असतांना रस्त्यात मयूर सुभाष सोळुंके, विजय बापू वाघ यांनी जुन्या भांडणाच्या वादावरून वाद घातला होता, परंतु मी त्याबाबतची तक्रार पोलीस स्टेशनला दिली नव्हती. गुरूवारी सकाळी माझा मुलगा निलेश नेहमीप्रमाणे शेतात गुरांना चारा-पाणी करण्यासाठी सहा वाजता गेला होता. तो नेहमी पंधरा-वीस मिनिटाने घरी येत असे, परंतु त्यादिवशी सात वाजेपर्यत तो घरी न आल्याने मी व माझे पती त्याला शेताकडे बघण्यासाठी गेलो असता मयूर - सुभाष सोळुंके, विजय बापू वाघ व इतर चार जण हे सर्व गावाकडे जातांना दिसले. त्यानंतर आम्ही पुढे जातांना आमच्या शेता शेजारी रहाणाऱ्या सुभद्राबाई गोविंदा मुरारी या भेटल्या. त्या म्हणाल्या, तुमची मोटरसायकल तुमच्या बांधाच्या कडेला पडलेली दिसली. आम्ही तिथे जाऊन बघितले तर माझा मुलगा निलेश मकाच्या शेतात. रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. आम्ही आरडाओरडा केल्यावर आजूबाजूचे रहाणारे लोक जमा झाले. या सर्वांनी दवाखान्यात देण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याआधीच निलेशची प्राणज्योत मालवली असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. या तक्रारीवरून मयूर सुभाष सोळुंके, विजय बापू वाघ आणि इतर चार जणांविरूद्ध कलम १०३ बी.एन.एस नुसार व अनुसूचित जमातनुसार पिशोर पोलीस ठाण्यात यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच पिशोर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजीराव नागवे, दुय्यम अधिकारी रतन डोईफोडे, रायटर विलास सोनवणे, बीट जमादार लालचंद नागलोत, गोपनीय अंमलदार संजय लगड, संजय दराडे, गणेश कवाळ यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी फिंगर प्रिंट पथकाला प्राचारण करण्यात आले. ए.पी.आय. ए.एम. पठाण, कॉन्स्टेबल पी. एस. आढे, बाविस्कर, तसेच पिंक पथकचे पी.एस.आय. सोमनाथ टापरे, कदिर पटेल, अमोल गायकवाड, रमेश छत्रे या सर्व टीमने घटनेचा पंचनामा करून मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्र करंजखेड येथे शवविच्छेदनासाठी पाठवला. डॉ. श्रीकांत तुपे यांनी मृतदेहाचे शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. डॉ. श्रीकांत तुपे यांनी सांगितले की धारदार शस्त्राने मयताच्या अंगावर २२ वार केलेले आहेत. गावठी पिस्तुलच्या बुलेटचे निशान नसल्याचेही त्यांनी सांगितले. सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, दोन जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याजवळील गावठी पिस्तुल ताब्यात घेतलेले आहे. उपविभागीय अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड, कॉन्स्टेबल नीलकंठ देवरे, जीवन नोंदवाल यांनी घटनास्थळी भेट दिली. पुढील तपास उपविभागीय अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड हे करत आहेत.

## जामिनावर सुटलेला खुनी रस्त्यात...

असलेल्या दादा लोकांना ही घाबरवत होता. त्याच्याशी हुज्जत घालून आपल्या हद्दीत कोणाला तो येवू देत नव्हता. हप्ता वसुली करण्यासाठी त्याने आपल्याच वयाची मुले तयार केलेली होती. त्यामुळे त्याच्या हद्दीत कुणी हप्ता वसल करायला आला की, त्याच्याशी त्याचे दोन हात होत होते.यातूनच त्याची अनेकांशी दुश्मनी झालेली होती. निपाणी शहरात त्याने टोळीच तयार केलेली होती. त्या टोळीचा तो हस्तक असल्याने अनेक गैर कामे तो करीत होता. सन २०२२ मध्ये मानवी गल्ली येथे राहणाऱ्या अभिजीत दतवाडे याच्याबरोबर त्याचा वाद झाला. या वादात अशरफअली याने अभिजीत दतवाडे याच्यावर चाकूने वार करीत त्याचा खून केलेला होता.ही घटना अभिजीत दतवाडे याचे मित्र रवी शिरगावे, रोहित पठाडे, ओम कंदले, पारस श्रीखंडे, ऋत्वीक पावले, आरबाज सय्यद, अनिकेत घोडगिरी याच्या जिव्हारी लागलेली होती. हे सर्वजण मयत अभिजीत दतवाडे याच्या जवळचे मित्र होते. आपल्या मित्राचा कारण नसताना अशरफअलीने खून केला. या खूनाचा बदला घ्यायचा असे त्यांनी त्या वेळी ठरविले. त्यातच अभिजीत दतवाडे याच्या खून प्रकरणी त्यावेळी बसवेश्वर पोलीसांनी आरोप पत्र दाखल करून अशरफअली याच्या विरोधात कोर्टात आरोपपत्र दाखल केले. या केसमध्ये अशरफअली नागरजी याला शिक्षा झाली. ती शिक्षा तो बेळगावी येथील हिडंलगा जेलमध्ये भोगत होता. त्यातच त्याला अलिकडे कोर्टाकडून या केसमध्ये जामीन मिळाल्याने तो जेलमधून बाहेर आला होता. रवी शिरगावे आणि त्याचे मित्र अशरफअली हा जेलममधून बाहेर येण्याचीच वाट बघत होते. त्यांना आपल्या मित्राच्या खूनाचा बदला घ्यायचा होता. जेलमधून बाहेर आल्यानंतर अशरफअली हा आपल्या फॅब्रिकेटरच्या व्यवसायाकडे जास्त लक्ष देत होता. त्याने गुन्हेगारी क्षेत्राकडील आपले लक्ष थोडे कमी केलेले होते. त्याला जामीन मिळाला असला तरी त्याच्यावर आंतरराज्य पोलीस ठाण्यात अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याने निपाणी शहर पोलीसांनी त्याच्या विरोधात हद्दपारीचा प्रस्ताव तयार करून तो मंजुरीसाठी जिल्हा पोलीस प्रमुखांना पाठविलेला होता. सध्या सणा सुद्दीचे दिवस असल्याने निपाणी पोलीस अशरफअली याच्यावर लक्ष ठेवून होते. बुधवार दि.२ ऑक्टोंबर २०२४ रोजी अशरफअली याच्या मित्राचा वाढदिवस होता. रात्री तो त्याचा भाऊ सैफअली नागरजी आणि मित्र प्रवीण चौगुले हे तिघेजण मित्राच्या वाढदिवसाची पार्टी करून रात्री ९च्या सुमारास भीमनगरातून चालत आपल्या घरी चालले होते. पार्टीत त्यांनी दारू पिली होती. त्या तिघांना ही नशा चढली असल्याने ते कसे तरी अंधारातून मार्ग काढत हलत डूलत चालले होते. ते तिघे म्युनसिपल शाळेजवळ आले असता त्याच्यासमोर रवी शिरगावे, ओम कंदले, रोहित पठाडे, पारस श्रींखडे, अरबाज सय्यद, ऋत्विक पावले आणि अनिकेत घोडगिरी अन्य चारजण आले. रवी शिरगावे याने आपल्याकडील पिस्तुल काढून ते अशरफअली याच्या डोक्याजवळ धरले. जरा जरी हालचाल केलीस तर तुझा मुडदाच पाडतो असे म्हणत इतरांनी अशरफअली आणि त्याचा भाऊ सैफअली नागराजी यांना मारहाण केली.रात्रीच्या अंधारात त्या तिघांना रवी शिरगावे आणि त्याच्या मित्रांनी मारहाण करीत असताना प्रवीण चौगुले हा त्याच्या तावडीतून पळून गेला. त्याचवेळी रवी शिरगावे आणि त्याच्या मित्रांनी अशरफअली याच्यावर आपल्याकडील कोयत्याने मानेवर, डोक्यावर, हातावर, पोटावर वार करीत मार साल्याला साला आपल्या अभिजीतचा खुन करतो काय? याला ही वरती पाठवलाच पाहिजे म्हणत अभिजीत तेरे खून का बदला लेगे अशरफअली को तरे पास भेज देगे म्हणत खून का बदला खून असे म्हणत त्याचा भाऊ सैफअली नागराज याच्यावर ही कोयत्याने वार केले. त्या वारात तो गंभीर रित्या जखमी झाला. तर अशरफअली हा रक्ताच्या थारोळ्यात पडला. कुणी तरी या घटनेची माहिती अशरफअली याच्या घरच्या लोकांना दिली. या घटनेची माहिती मिळताच अशरफअली याच्या घरचे नातेवाईक आणि मित्र मंडळी यांनी घटनास्थळी धाव घेत एकच गल्का केला. गंभीर जखमी असलेल्या सैफअली याने या घटनेची माहिती निपाणी शहर पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या घटनेत अशरफअली आणि सैफअली हे दोघे गंभीर जखमी झाले असल्याने पोलीसांनी नातेवाईकांच्या मदतीने त्यांना उपचारासाठी निपाणी येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले. परंतु अशरफअली याच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने त्याची परिस्थीती गंभीर बनली. त्याला पुढील उपचारासाठी कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर घटनास्थळावरून पळून गेले होते. घटनास्थळी चप्पला, रक्ताने माखलेला कोयता पडलेला होता. या घटनेचा पोलीसांनी पंचनामा करून याची माहिती जखमी असलेल्या सैफअली नागरोजी याच्याकडून घेतली. त्याने घडलेला घटनाक्रम सांगून पोलीसांना रवी शिरगावे आणि त्याच्या इतर मित्रांची नावे सांगितली. ऐन सणासुद्दीत नवरात्र उत्सवात सराईत गुन्हेगाराची हत्या झाल्याने पोलीस यंत्रणा ही हडबडून जागी झाली होती. घटनास्थळी जिल्हा पोलीस प्रमुख डॉ.भीमाशंकर गुळेद, सीपीआय बी.एस, तळवार यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. निपाणी शहर पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून परिसरातील सीसीटीव्हीच्या फुटेजची पाहणी केली. या फुटेजमध्ये सैफअली नागरोजी याने सांगितलेले संशयीत दिसत होते. या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करीत होते पोलीसांनी संशयीत आरोपीचे मोबाईल कॉलचे लोकेशन तपासले असता ते लोकेशन महाराष्ट्रतील रत्नगिरी येथे दाखवित होते.

यावरून पोलीसांच्या एका पथकाने रत्नागिरी येथे जाऊन त्याच्या मुसक्या आवळ्या. त्यांना ताब्यात घेऊन निपाणी शहर पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता. त्यांनी आपला गुन्हा कबुल केला. मयत अशरफअली नागरोजी याचा भाऊ सैफअली नागरोजी याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी अशरफअली शेअरअली नागरोजी (वय २०) याच्या खून प्रकरणी रवी इराण्णा शिरगावे (वय २७) रा.हणबर गल्ली निपाणी, रोहित प्रशांत पठाडे (वय २४), रा.हौसाबाई सावंत कॉलनी. निपाणी, ओम दिलीप कंदले (वय २४) रा.कुंभार गल्ली, निपाणी, पारस संजय श्रीखंडे (वय २२) रा.जत्राट वेस, निपाणी, ऋत्वीक सदाशिव पावले (वय २५) रा.महादेव गल्ली निपाणी,अरबाज राजमहंमद सय्यद (वय २४) रा. हौसाबाई सावंत कॉलनी, निपाणी. अनिकेत कृष्णा घोडगिरे (वय २२) रा.सासणे गल्ली,निपाणी आणि इतर पळून गेलेल्या तीन जणांच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) आणि इतर कलमाखाली गुन्हा दाखल करून पोलीसांनी त्यांना निपाणी येथील प्रथम वर्ग कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने या सर्वाची रवानगी बेळगावी येथील हिडंलगा जेलमध्ये केली.या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता, पिस्तुल जप्त केले. या घटनेचा पुढील तपास सीपीआय बी.एस.त ळवार उप निरीक्षक उमादेवी, बसवेश्वर पोलीस ठाण्याचे पो.निरी.रमेश पवार हे करीत आहेत. हल्लीची गुन्हेगारीकडे वळालेली तरूण पिढी ही खटक्यावर बोट जागेवर पलटी या न्यायाने वागत असल्याने खून का बदला खून म्हणून जागेवरच एखाद्याचा बदला घ्यायला मागे पुढे पाहत नाही हेच या घटनेवरून दिसून येते.

## कुटुंबातील वाद मिटवायला गेला...

झाली आहेत. दरम्यान, समीर शेख याने दिलेल्या फिर्यादीनुसार मृत शहाजहान शेख, त्याचा मुलगा सलीम शेख, शाहिद शेख, आतिफा सलीम शेख, सुलताना शेख, शाकीर शेख अशा सहाजणांविरुद्ध मारहाणीचा गुन्हा नोंद झाला आहे. शेख कुटुंबीयांत घर जागेच्या वाटणीचा वाद होता. मृत शहाजहान हा दौंडमध्ये कुटुंबीयासह वास्तव्यास होता. इकडे जागेचा वाद मिटविण्यासाठी आणि घरातच सख्ख्या भाचीच्या लग्न सोहळ्याची तयारी करण्यासाठी शहाजहान कुटुंबीयासह आला होता. परंतु जागेचा वाद मिटवताना भांडण विकोपास गेले. यात वाद सोडवणे शहाजहान याच्या अंगलट आले. दोघे भाऊ, भावजयींसह पुतण्यांनी लाकडी बॅट, दांडक्यांनी शहाजहान व त्याच्या मुलावर प्राणघातक हल्ला केला. डोक्यास जबर मार लागल्याने शहाजहान गंभीर जखमी होऊन मरण पावला. पोलिसांनी मृत शहाजहानचा भाऊ साबीर शेख, त्याची पत्नी मेहरून यांच्यासह पुतणे साकी आणि सुफियान या चौघांना अटक केली. त्यांना पाच दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्याय दंडाधिकाऱ्यांनी दिले आहेत. पोलीस निरीक्षक विकास देशमुख हे पुढील तपास करीत आहेत.

14 TO 20 OCTOBER 2024 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 10/12/2024 8:45 PM Page 1



# सभापती मनीषा निमकर यांच्या 'निर्धार समाज कल्याणाचा' पुस्तिकेचे विमोचन

## मनीषा निमकर यांनी समाज कल्याणाचा निर्धारच केला आहे - जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम




**पालघर/प्रतिनिधी**

माजी राज्यमंत्री तथा विद्यमान समाज कल्याण समिती सभापती, मनीषा निमकर यांनी समाज कल्याण सभापती पदाचा पदभार स्वीकारल्यापासून समाज कल्याण विभागाला नवी उमेद, नवी झळाळी देण्याचे काम केले आहे, समाज कल्याणाचा निर्धारच त्यांनी केला आहे, असे प्रतिपादन आज जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी केले. समाज कल्याण समिती सभापती मनीषा निमकर यांनी तयार केलेल्या 'निर्धार समाज कल्याणचा लेखाजोगा २०२४' या अहवाल पुस्तिकेचे आज अनावरण करण्यात आले, त्या निमित्ताने ते बोलत होते. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, समाज कल्याण समिती सभापती मनीषा निमकर, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती संदीप पावडे, महिला व बालकल्याण समिती सभापती रोहिणी शेलार, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, पं.स.सभापती शैला कोळेकर, जिल्हा परिषद सदस्य तसेच सर्व विभाग प्रमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषद पालघर जननायक बिरसा मुंडा सभागृह येथे आज दिनांक ११/१०/२०२४ रोजी या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. पुढे बोलताना ते म्हणाले की समाज कल्याण विभागात कमी कर्मचारी असून देखील या विभागाच्या इतक्या योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचं काम केलं जातं, सभापती मनीषा निमकर यांच्या नेतृत्वाखाली सर्वात जास्त निधी खर्च करणारा विभाग हा समाज कल्याण विभाग आहे. मनीषाताई या स्वतः प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोचून त्याला लाभ मिळाला आहे की नाही याची चौकशी करीत असतात. त्यांनी हा समाज कल्याण विभागाचा योजनांची माहिती देणारा अहवाल प्रसिद्ध केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो, अशा भावना यावेळी अध्यक्ष प्रकाश निकम यांनी व्यक्त केल्या. सभापती मनीषा निमकर यांनी प्रसिद्ध केलेल्या या समाज कल्याण विभागाच्या अहवालामध्ये समाज कल्याण मधील सर्व योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे, दिव्यांग पशुपालकांना दुधाळ जनावरे, दिव्यांग महिलांना लघु उद्योगा करता साहित्य पुरवणे घरघंटी पुरवणे, मान्यता प्राप्त अनुदानित विशेष मुलांच्या शाळांना दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी अर्थसहाय्य करणे, दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य करणे, आंतरजातीय विवाहस प्रोत्साहन पर अनुदान योजना, अपंग व अभंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन पर अनुदान योजना व इतर अनेक योजनांची सविस्तर माहिती अहवालामध्ये दिली आहे. तसेच सर्व योजनांच्या अर्जांचे नमुने देखील अहवालामध्ये पाहायला मिळतात. सभापती मनीषा निमकर यांच्या निधीतून झालेल्या विस्तृत कामांचा आढावा या अहवालात घेतलेला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण, आमदार हितेंद्र ठाकूर, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, उपाध्यक्ष पंकज कोरे तसेच सर्व सभापती व इतर मान्यवरांनी या अहवालास शुभ संदेश दिले आहेत.सभापती मनीषा निमकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की असा अहवाल तयार करणे आणि तो लोकांपर्यंत पोचवणे हे प्रत्येक लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे असे मला वाटते,हा अहवाल तयार करताना जिल्हा परिषदेचे सर्व अधिकारी आणि पदाधिकारी तसेच समाज कल्याण विभागाचे अधिकारी आणि पदाधिकारी यांचे विशेष योगदान लाभले.मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी सर्वांच्या मेहनतीचा परिपाक या अहवालाच्या रूपाने आपल्यासमोर आला असून, मनीषा ताईंच्या पाठपुराव्यामुळे हे शक्य झाले आहे, असे सांगून त्यांनी सभापती मनीषा निमकर यांना शुभेच्छा दिल्या.कासा ग्रामपंचायतीचे उपसरपंच हरेश मुकणे यांनी आवर्जून उपस्थित राहून आपले मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रवीण भावसार यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले.या कार्यक्रमा वेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप मुख्य लेखा वित्त अधिकारी धनराज पांडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर व जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# पालिकेच्या वालीव येथील बेघर निवारा केंद्रामध्ये जागतिक बेघर दिवस साजरा



**वसई/प्रतिनिधी**

वसई विरार शहर महानगरपालिका, दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत, दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी वालीव, वसई (पूर्व) येथील वालीव बेघर निवारा केंद्रामध्ये आयुक्त अनिलकुमार पवार (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, मा.उपायुक्त सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक बेघर दिवस साजरा करण्यात आला.

सदर दिनानिमित्त निवाऱ्यामध्ये लाभार्थ्यासाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. त्याचबरोबर Hb, CBC, HIV रक्त तपासणी सुद्धा करण्यात आली. बेघर लाभार्थ्यांच्या सहभागाने परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. सदर साप्ताहिक उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांना बेघर व्यक्तींविषयी जाणीवजागृती व जिव्हाळा निर्माण व्हावा, ह्या उद्देशाने निबंध व चित्रकला स्पर्धा या आठवड्यात घेण्याचे नियोजन करण्यात आले. तसेच लाभार्थ्यांच्या पुनर्वसन व रोजगार उपलब्धी करिता उपजीविका केंद्राचे उद्घाटन उपायुक्त सुभाष जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. सदर केंद्राच्या माध्यमातून देणगी मधून प्राप्त जुन्या कपड्यांपासून गोधडी, पाय पुसणी, कापडी पिशवी शिवणकला याचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले. बेघर निवारा स्वच्छता व सजावट करण्यास लाभार्थ्यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमामध्ये DAY-NULM मा.नियत्रंक सुखदेव दरवेशी, शहर अभियान व्यवस्थापक श्रीम.रुपाली कदम, डॉ. राणी बदलानी, डॉ.दुधमल व वैद्यकीय टीम, प्रभाग समिती 'जी' चे अधिक्षक राजेंद्र कदम व कर्मचारी, समूदाय संघटीका रेणुका, युवा प्रशिक्षणार्थी यांची टीम, तसेच बचत गटातील महिला, सर्व बेघर लाभार्थी बोधी संस्था यांचे उत्स्फूर्तपणे सहभाग व सहकार्य लाभले.

# भिवंडीत डाईंग सायजिंगच्या प्रदूषणाने नागरिक हैराण




**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरात यंत्रमाग व्यवसायाला पूरक कपड्यावर रंग प्रक्रिया करणाऱ्या डाईंग सायजिंग मोठ्या प्रमाणात असल्याने शहर सध्या प्रदूषणाच्या विळख्यात सापडले आहे. येथील डाईंग व सायजिंग धुरांडीतून दिवसरात्र विषारी वायू हवेत सोडत असल्याने शहरातील प्रदूषणात वाढ झाली असून परिणामी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. डाईंग सायजिंगमधून निघणाऱ्या जीवघेण्या धुरामुळे शहर व शहरा लगत असलेल्या ग्रामीण भागातील स्थानिक नागरिकांना श्वसनाचे त्रास होत आहेत. मात्र या डाईंग साइजिंगच्या प्रदूषणाकडे प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कोणतेही नियंत्रण भिवंडीतील डाईंग सायजिंग व कारखाने तसेच प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर नसल्याने येथील प्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. ज्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. भिवंडी प्रदूषण कमी असल्याचा दावा काही दिवसांपूर्वी महापालिका प्रशासनाने केला होता. मात्र सध्या शहरातील डाईंग साईझिंग मधून निघणाऱ्या प्रदूषित धुरा मुळे शहरातील प्रदूषणात प्रचंड वाढ झाल्याचे चित्र सध्या शहरात दिसत आहेत. भिवंडीतील डाईंग सायजिंगच्या प्रदूषणा पासून होणाऱ्या त्रासा विरोधात मागील पाच ते सहा वर्षापासून मी सातत्याने लढत आहे. त्यासाठी रास्ता रोको आंदोलनासह अनेक तक्रारी व निवेदने प्रदूषण नियंत्रण मंडळा बरोबरच शासनास दिली आहेत मात्र आजही डायिंग सायजिंगच्या प्रदूषणाचा त्रास नागरिकांना होत आहे, दोन तीन वर्षापूर्वी भिवंडी प्रांताधिकाऱ्यांनी आमच्या आंदोलनाची दखल घेऊन प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांना नोटीस बजावल्या आहेत, मात्र प्रदूषण कमी करण्यासाठी केलेल्या उपाय योजनांचा तपशील संबंधित कंपन्यांनी ग्राम पंचायतींकडे सादर केला नसल्याने या कंपन्यांनी नेमकी काय नियम पाळले या विषयी प्रश्नचिन्ह असून लवकरच याविषयी पुन्हा आंदोलनाची दिशा ठरवली जाईल अशी माहिती ॲड.किरण चन्ने यांनी दिली आहे.

# पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांच्या हस्ते गणेश मंडळांना पारितोषिक वितरण

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

श्री गणेश उत्सवाच्या दरम्यान सामाजिक सलोखा राहण्या करीता सोलापूर तालुका, पोलीस ठाणेच्या अंतर्गत गावातील गणेश मंडळांनी सामाजिक उपक्रम राबवावेत म्हणुन सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पेनेतुन अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर सोलापूर ग्रामीण उपविभाग यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका, पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी पोलीस ठाणे कडील कार्यरत असलेले पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचेसह सोलापूर तालुका, पोलीस ठाणेच्या वतीने जनजागृती केली होती.




त्या करीता गणेश मंडळा करीता सर्वोत्कृष्ट गणेश उत्सव मंडळ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये सोलापूर तालुका, पोलीस ठाणेच्या हद्दीतील एकूण १२० गणेश मंडळाचे परीक्षण व मुल्यमापन करीता राज सांळुखे व आतिश गवळी या दोघांच्या पथकांनी केले आहे. त्यामध्ये गुणांकन क्रमांका नुसार मौजे बीबीदारफळ ता.उत्तर सोलापूर येथील शिवप्रेमी गणेशोत्सव मंडळ यांनी प्रथम क्रमांक, मौजे बोरामणी येथील जयलक्ष्मी तरूण मंडळ यांनी व्दितीय क्रमांक, मौजे मार्डी येथील नागेश युवक मंडळ यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. उत्तेजनार्थ म्हणुन होनसळ येथील जय श्रीराम मंडळ व हगलुर येथील जय हनुमान तरूण मंडळ यांना पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. सोलापूर ग्रामीण उपविभागाच्या स्तरावर उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर उपविभाग सोलापूर यांनी सोलापूर उपविभागातुन सर्वोत्कृष्ट तीन गणेश मंडळे निवडली होती. त्या सर्वांना पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. सोलापूर ग्रामीण उपविभागातुन प्रथम क्रमांक बीबीदारफळ ता.उत्तर सोलापूर येथील शिवप्रेमी गणेशोत्सव मंडळ, व्दितीय क्रमांक मौजे बोरामणी येथील जयलक्ष्मी तरूण मंडळ यांना व तृतीय क्रमांक मंद्रुप येथील मानाचा मध्यवर्ती श्री महात्मा बसवेश्वर गणेशोत्सव मंडळ या मंडळास दिला आहे. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी उपस्थित सर्वाना आगामी काळात येणारे सर्व सण उत्सव डॉल्बीमुक्त व पर्यावरण पुरक करून पारंपारिक वाद्य वाजुन साजरे करावेत. डॉल्बीमुक्त केल्यामुळे आजारी व्यक्तींना त्याचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. आगामी काळात येणारी विधानसभा निवडणुक शांततेत पार पाडावी याकरीता सर्वांनी पोलीसांना सहकार्य करावे, मार्गदर्शनपर सूचना दिल्या आहेत. सदर कार्यक्रमाचे प्रस्तावना सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे केले. सूत्रसंचालन सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान कदम तर आभार प्रदर्शन सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज अभंग यांनी केले आहे. सदर कार्यक्रमा करीता गणेश मंडळाचे पदाधिकारी तसेच पोलीस पाटील बहुसंख्येने उपस्थित होते.

# आदिवासी समाजाचा बुलंद आवाज काळूराम 'काका' धोदडे यांचे निधन

**पालघर/प्रतिनिधी**

आदिवासी समाजाला स्वाभिमानाने जगायला शिकवणारे, जल, जंगल जमीन यावर आदिवासी, भूमिपुत्र शेतकऱ्यांचे अधिकारासाठी लढणारे, आदिवासी बांधवांचे प्रेरणास्थान तसेच भूमीसेना व आदिवासी एकता परिषदचे संस्थापक काळूराम का. धोदडे उर्फ काका (८८) यांची १० ऑक्टोबर रात्री १०.५२ वाजता यांचे मुंबई येथील रुग्णालयात प्राणज्योत मालवली. त्यांचे अंतिम दर्शन आणि अंतिम संस्कार भूमिसेना,



आदीवासी एकता परिषदेचे मनोर (दामखिंड) कार्यालयात ११ ऑक्टोबर, रोजी दुपारी २.०० वाजता करण्यात आले. आदिवासी बांधवांच्या हक्कासाठी तसेच होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनी अनेक आंदोलने केली. राष्ट्रीय प्रकल्पांच्या उभारणी मुळे पालघर जिल्ह्यातील आदिवासी बांधव व भूमिपुत्र उध्वस्त होत असल्याकडे त्यांनी आंदोलनाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून दिले. पाच दशकांपेक्षा अधिक काळ ते आदिवासी बांधवांकरिता चळवळीत सक्रिय होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते.

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक ११७ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी, पालघर-बोईसर रोड, पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून मागवित आहेत. खालील कामांकरीता 'बी-१' नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये एकूण ०२ (दोन) काम समाविष्ट आहेत.

टिप : या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://mahatenders.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये (जी.एस.टी.वगळून) | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | पालघर तालुक्यातील मौजे घिवली आंबेडकर नगर येथे स्मशानभुमीसह विसावा शेड बांधणे. ता.जि.पालघर | रु. १२४२०१७/- | २२२५ अनुसुचित जाती अनुसुचित जमाती |
| २. | मौजे चहाडे ता.ह. पाटील विद्यालय येथे सार्वजनिक सभागृह बांधणे. ता.जि. पालघर | रु. १६७६२४२/- | खासदार स्थानिक विकास कार्यक्रम |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. १४/१०/२०२४ ते दि. २१/१०/२०२४ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. २२/१०/२०२३ सकाळी ११.०० नंतर शक्य झाल्यास.

**जा.क्र. : सा.बां.वि./पालघर/निविदा/१०३६६**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
सा.बां. विभाग, पालघर बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालया शेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता.जि.पालघर (पश्चिम) ४०१ ४०४
दिनांक : ०९/१०/२०२४

**सही/-**
**(स. प्र. पाटील)**
**कार्यकारी अभियंता,**
**सावजिनिक बांधकाम विभाग, पालघर**

**जिमाका/पालघर/जाहि १२६/४४४/२०२४ दिनांक : १०/१०/२०२४**

# विरार येथील विवा महाविद्यालयात रक्तदान शिबीर संपन्न



**विरार/प्रतिनिधी**

'रक्त दान हेच सर्वश्रेष्ठ दान' असं म्हटलं जातं. याचाच आदर्श घेत विरार येथील विवा महाविद्यालयात लोकनेते आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त नायर हॉस्पिटल आणि सरला ब्लड बँक, विवा महाविद्यालय हॉटेल मॅनेजमेंट विभाग आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (छउउ), एनएसएस युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने ३ ऑक्टोबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात ५ एचए कंपनी आणि ८ चरह गर्ल्स इछ छउउ युनिट तर्फे नायब सुभेदार जी. व्यंकटेसन आणि पी.एस. करवंदे यांनी उपस्थिती लावली. या शिबिराला संस्थेचे अध्यक्ष आणि आमदार हितेंद्र ठाकूर, आमदार क्षितिज ठाकूर, खजिनदार शिखर ठाकूर यांनीही रक्तदान करून आपले कर्तव्य पार पाडत इतरांचा उत्साह वाढवला. दुपारी २.०० वाजेपर्यंत सुरू असलेल्या या शिबिरातून या शिबिरात ११४ युनिट रक्त जमा झाले. त्यात एनसीसी, एनएसएस युनिटच्या अनेक विद्यार्थ्यांनी रक्तदान करत आपले योगदान दिले. ट्रस्टच्या सेक्रेटरी अपर्णा ठाकूर, व्यवस्थापन समितीचे सदस्य संजीव पाटील, संजय पिंगुळकर, एस.एन पाध्ये, विवा महाविद्यालयाचे समन्वयक नारायण कुट्टी, प्राचार्य डॉ.वी.श.अडिगल, उपप्राचार्य डॉ. प्राजक्ता परांजपे, उप प्राचार्या तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. दीपा वर्मा, हॉटेल आणि टुरिझम मॅनेजमेंट मधील हॉस्पिटॅलिटी स्टडीज आणि कलिनरी आर्टचे विभागप्रमुख वैभव पाटील, एनसीसी प्रमुख वैभव सातवी, एनसीसी ऑफिसर क्षितिजा पालव (सिटीओ), डॉ. दीपक गुप्ता, डॉ. स्मिता पिलई, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ.दीपा दळवी, कोमल पाटील, डॉ. मधुरा सुर्वे व अन्य सहकारी वर्ग यांची साथ लाभली. ही संपूर्ण रक्तदान शिबिर प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी एनसीसी, एनएसएस युनिट आणि हॉटेल मॅनेजमेंट विभागाचे विद्यार्थी विशेष मेहनत घेत होते.

# टिटवाळ्यात रिक्षा चालकाबरोबरच्या भांडणातून प्रवाशाचा मृत्यू

**कल्याण/प्रतिनिधी**

टिटवाळ्यात गुरुवारी रात्री एका रिक्षा चालकाला एका प्रवाशाने प्रवासी भाड्याची ५० रूपयांची नोट दिली. ही नोट फाटकी आहे. ती बदलून दे, या विषयावरून रिक्षा चालक आणि प्रवाशी यांच्यात जोरदार हाणामारी झाली. या हाणामारीत प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला. अंशुमन शाही असे मरण पावलेल्या प्रवाशाचे नाव आहे. राजा भोईर असे आरोपी रिक्षा चालकाचे नाव आहे. मयत शाही हे हरीओम व्हॅली संकुलात कुटुंबीयांसह राहतात. गुरुवारी रात्री कामावरून परतल्यावर त्यांनी टिटवाळा रेल्वे स्थानकात नेहमीप्रमाणे घरी येण्यासाठी रिक्षा पकडली. रिक्षेतून घराजवळ उतरल्यावर अंशुमन शाही यांनी ५० रूपयांची नोट रिक्षा चालक राजा भोईर याला दिली. राजा यांनी दिलेली नोट फाटकी आहे. आणि ती नोट मला का दिली. नोट बदलून द्या, अशी आक्रमक मागणी केली. आपल्याजवळ सुट्टे पैसे नाहीत. त्यामुळे ही नोट घ्या. चालत नसेल तर तर परत घेईन असे सांगुनही राजा भोईर काही ऐकण्यास तयार नव्हता. या फाटलेल्या नोटेवरून प्रवासी अंशुमन आणि रिक्षा चालक राजा भोईर यांच्या रस्त्यावर जोरदार हाणामारी झाली. भोईर यांनी शाही यांना बेदम मारहाण केली. हाणामारीनंतर अंशुमन शाही रस्त्यावर बेशुध्दावस्थेत पडले. कुटुंबीय आणि काही पादचाऱ्यांनी अंशुमन यांना तातडीने रुग्णालयात नेले. तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. टिटवाळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांनी सांगितले, प्रवासी अंशुमन शाही यांचा मृत्यू रिक्षा चालकाबरोबर झालेल्या भांडणानंतर आलेल्या हदयविकाराच्या धक्क्याने झाला आहे. त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरवून आम्ही रिक्षा चालक राजा भोईर याला अटक केली आहे.

# निवडणुकीपायी सरकारी निर्णयांची घाई!

निवडणुका आल्या की ज्यांचे कोणाचे सरकार असते ते सक्रिय होतात. कारण आम्ही जनतेच्या प्रती किती जबाबदारीने वागत आहोत, हे त्यांना दाखवून द्यायचं असतं आणि तोच मुद्दा घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरायचं असतं. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक अगदी तोंडावर आलेली असताना, जो प्रकार लोकसभेच्या निवडणुकीत घडला आणि महाराष्ट्रात महायुतीला बॅक फुटवर जायला लागले. तसाच प्रकार विधानसभा निवडणुकीत होऊ नये म्हणून महाराष्ट्रातील महायुती सरकारने, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली. सरकार कर्जाच्या खाईत गळ्यापर्यंत रुतलेले असतानाही, दर महिन्याला ४५ हजार कोटींची तरतूद करून महिलांना दीड हजार रुपये वाटले जात आहेत. अर्थात त्यातून बिचाऱ्या गरीब महिलांना आर्थिक मदत झाली ही चांगली गोष्ट आहे. पण हे सगळं आताच का? निवडणुकीवर डोळा ठेवून अशा प्रकारच्या योजना राबवणे म्हणजे मतदारांना एक प्रकारे लाच दिल्यासारखे आहे. महायुती सरकारला सत्तेत येऊन आता दोन वर्षे व्हायला आली. या दोन वर्षात त्यांनी जी कामे केली नसतील, ती गेल्या दोन महिन्यात करताना दिसत आहे. आणि हे सगळं फक्त निवडणुकीसाठी आहे, हे वेगळं सांगायची आवश्यकता नाही. आताही सरकार किती सक्रिय आहे आणि जनतेची सरकारला किती काळजी आहे, हे दाखवण्यासाठी एका एका दिवसात ८० निर्णय घेतले जात आहेत. १० ऑक्टोबर रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ८० निर्णय घेण्याचा महायुती सरकारने एक नवा विक्रम केला. या निर्णयांमध्ये वांद्रे शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांना घरांसाठी जागा देणे. सावनेर, गोंदिया, कणकवली, राजापूर, अंबरनाथ आधी ठिकाणच्या जलसंपदाच्या कामांना मान्यता देणे. वाचन संस्कृती ग्रंथ चळवळ विकसित करणे. नवीन महाविद्यालयांची अर्जाची मुदत वाढवणे. राज्यातील अंगणवाडी केंद्रांमध्ये पाळणाघरे सुरू करणे. सिडको व पीएमआरडीएसला दिलेले भूखंड गृहनिर्माण संस्थांच्या मालकीचे करणे. केंद्राची ऍग्रीस्टॅक योजना राज्यात राबवणे. आपले सरकार केंद्र चालकांना ग्राम रोजगार सेवकांप्रमाणे मानधन देणे. बोरवली तालुक्यातील जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी देणे. राज्यातील मोठ्या शासकीय रुग्णालयांमध्ये सुलभ शौचालयांची व्यवस्था करणे. पत्रकार वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी दोन स्वतंत्र महामंडळे देणे. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देणे. बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्रासाठी ७०९ कोटींचा अतिरिक्त निधी देणे. पालघर जिल्ह्यातील विविध गावांमधील जागा एमआयडीसीला देणे. पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाची पुनर्रचना करणे. भेंडोळे वस्ती प्रकल्प पाणीपुरवठा विभागास हस्तांतरित करणे. राज्यात आंतरराष्ट्रीय रोजगार व कौशल्य विकास कंपनी स्थापने. शिंपी गवळी लाडशाखीय वाणी वाणी, लोहार, नाथपंथीय समाजासाठी महामंडळे स्थापन करणे. नॉन क्रिमीलेयरची उत्पन्न मर्यादा वाढवण्याची केंद्राला विनंती करणे. शाळांना अकराशे कोटींचे वाढीव टप्पा अनुदान मंजूर करणे. असे कितीतरी निर्णय शासनाने एका दिवसात घेतले आहेत. मग गेल्या दोन वर्षात सरकार काय करीत होते ?हे निर्णय गेल्या दोन वर्षात टप्प्याटप्प्याने घेता आले असते. पण तसे झाले नाही. या निर्णयासाठी ज्या मागण्या केल्या जात होत्या. जे आंदोलने केली जात होती. त्यांना सरकारने त्यावेळेला लटकवत ठेवले. आणि आता निवडणुकीच्या तोंडावर अशा प्रकारचे निर्णय घेणे म्हणजेच एक प्रकारे मतदारांना लाच देण्यासारखे आहे, असा आरोप विरोधी पक्ष करीत आहे. आणि त्या आरोपात खरोखरच तथ्य आहे असे म्हणायला हरकत नाही. सरकार म्हटले की त्यांनी प्रत्येक निर्णय वेळच्यावेळी घ्यायला हवा. तरच लोकांचा विश्वास बसू शकतो. लाडकी बहीण योजनेबाबत सांगायचे झाल्यास, मध्य प्रदेशात ही योजना गेम चेंजर ठरली होती. आणि ती राबवण्यामागचे कारण होते व्यापम घोटाळा दाबने! व्यापम घोटाळा हा भारतातील सगळ्यात मोठा घोटाळा होता. तो दाबण्यासाठी मध्य प्रदेशातील भाजपा सरकारने लाडली बहन योजना आणली आणि आपले सरकार वाचवले. आता तोच प्रकार महाराष्ट्रातील महायुती सरकारने केलेला आहे. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महायुतीला आपले सरकार वाचवता येईल, की नाही हे आत्ताच सांगणे कठीण आहे. पण या योजनेचा निश्चितपणे निवडणुकीत फायदा होणार आहे. पण अशा मोठ्या आणि तितक्याच खर्चिक योजना केवळ निवडणुका जिंकण्यासाठी राबवणे, अत्यंत चुकीचे आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे विधानसभा निवडणूक तोंडावर आल्यानंतरच सरकारला जाग आलेली आहे. पण विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर एका एका दिवसाला ७० ते ८० निर्णय जाहीर करणे हा प्रकार नेमका काय आहे, हे लोकांच्या लक्षात येणार नाही असे महायुतीच्या लोकांनी समजू नये. लोकांना हा सगळा प्रकार माहिती आहे. केवळ आणि केवळ निवडणुका जिंकण्यासाठीच महायुती सरकारने हा खटाटोप चालवलेला आहे. पण त्याचा सरकारला किती फायदा होईल हे आत्ताच सांगता येणार नाही. कारण महाराष्ट्र म्हणजे बिहार किंवा उत्तर प्रदेश नाही. महाराष्ट्रातले लोक, महाराष्ट्रातले मतदार अत्यंत हुशार आहेत. त्यांना सरकारमध्ये बसलेल्या लोकांची कुंडली ठाऊक आहे. त्यामुळे सरकारने आता किती जरी लोकांना मदत केली किंवा लोकहिताचे किती जरी निर्णय घेतले, तरी लोकांचे मतपरिवर्तन होईल असे वाटत नाही.

## वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मुख्य कंपनी अंतर्गत, राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, उपकंपनी पैलवान कै.मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ, उपकंपनी

# या कंपनीमार्फत योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

पालघर/प्रतिनिधी

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची मुख्य कंपनी अंतर्गत स्थापन असलेल्या पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ उपकंपनी तसेच राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ उपकंपनी अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनेसाठी पात्र व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) बीज भांडवल कर्ज योजनेची कर्ज मर्यादा प्रकल्प रु.५ लाखापर्यंत असुन बँकेचा सहभाग ७५% असून महामंडळाचा सहभाग २५% असुन व्याज दर हा वार्षिक ४ % असुन परतफेडीचा कालावधी हा ५ वर्षे आहे. ही योजना कृषी संलग्न व पारंपारिक उपक्रम, लघु व्यवसाय उदा. मत्स्य व्यवसाय, कृषी क्लिनिक, पॉवर टिलर, हार्डवेअर व पेंट शॉप, सायबर कॅफे, संगणक प्रशिक्षण, झेरॉक्स, स्टेशनरी, सलुन ब्युटीपार्लर, मसाला उद्योग, पापड उद्योग, मसाला मिर्ची कांडप उद्योग, वडापाव विक्री केंद्र, भाजी विक्री केंद्र, फळ विक्री, किराणा दुकान, ऑटोरिक्षा, चहा विक्री केंद्र, सॉफ्ट टॉईज विक्री केंद्र, डी.टी.पी. वर्क, स्विट मार्ट, ड्राय क्लिनिंग सेंटर, हॉटेल, टायपिंग इन्टीटयुट, ऑटो रिपेअरींग वर्कशॉप, मोबाईल रिपेअरिंग, गॅरेज, फ्रिज दुरुस्ती, चिकन/मटन शॉप, इलेक्ट्रिकल शॉप, आईस्क्रिम पार्लर, मासळी विक्री, आठवडी बाजारमध्ये छोटेसे दुकान, टेलिफोन बुथ व अन्य तांत्रिक लघु उद्योग इ, उत्पादन, व्यापार व विक्री सेवा क्षेत्रासाठी आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थींचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न शहरी भागाकरीता रु.१ लाख व ग्रामीण भागाकरीता ९८,०००/- पर्यत मर्यादित असावे. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आणि विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील असावा वय १८ ते ५० वर्ष दरम्यान असावे. अर्जदाराचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य राहिल. कर्ज मागणी अर्ज फक्त अर्जदार यांनाच मिळेल. अर्जदार कोणत्याही बँकेच्या कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. अर्ज करतेवळी सदर प्रकल्पासाठी यापूर्वी महामंडळाच्या किंवा इतर कोणत्याही महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्र १. जात प्रमाणपत्र २. उत्पन्नाचा दाखला किंवा नॉन क्रिमिलेअर लेयर प्रमाणपत्र ३ रेशन कार्ड ४ रहिवासी प्रमाणपत्र ५ वयाचा पुरावा / शाळेचा दाखला. ६ आधार कार्ड / पॅन कार्ड ७. व्यवसायाच्या अनुषंगाने कोटेशन आवश्यक राहील.

२) थेट कर्ज योजनेची कर्ज मर्यादा रु.१ लाखापर्यंत असुन महामंडळाचा सहभाग १००% आहे. ही योजना कृषी संलग्न व पारंपारिक उपक्रम, लघु व्यवसाय उदा. मत्स्य व्यवसाय, कृषी क्लिनिक, पॉवर टिलर, हार्डवेअर व पेंट शॉप, सायबर कॅफे, संगणक प्रशिक्षण, झेरॉक्स, स्टेशनरी, सलुन ब्युटीपार्लर, मसाला उद्योग, पापड उद्योग, मसाला मिर्ची कांडप उद्योग, वडापाव विक्री केंद्र, भाजी विक्री केंद्र, फळ विक्री, किराणा दुकान, ऑटोरिक्षा, चहा विक्री केंद्र, सॉफ्ट टॉईज विक्री केंद्र, डी.टी.पी. वर्क, स्विट मार्ट, ड्राय क्लिनिंग सेंटर, हॉटेल, टायपिंग इन्टीटयुट, ऑटो रिपेअरींग वर्कशॉप, मोबाईल रिपेअरिंग, गॅरेज, फ्रिज दुरुस्ती, चिकन/मटन शॉप, इलेक्ट्रिकल शॉप, आईस्क्रिम पार्लर, मासळी विक्री, आठवडी बाजारमध्ये छोटेसे दुकान, टेलिफोन बुथ व अन्य तांत्रिक लघु उद्योग इ, उत्पादन, व्यापार व विक्री सेवा क्षेत्रासाठी आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थींचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.१ लाखाच्या मर्यादित असावे. कर्ज मागणी अर्ज फक्त अर्जदार यांनाच मिळेल. नियमीत कर्ज परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकरण्यात येणार नाही. तसेच नियमीत कर्ज परतफेड न करणा-या लाभार्थींना जेवढे कर्जाचे हप्ते थकीत होतील, त्या रक्कमेवर द.सा.द.शे. ४% व्याज आकरण्यात येईल. अर्जदार कोणत्याही बँकेच्या कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. अर्ज करतेवळी सदर प्रकल्पासाठी यापूर्वी महामंडळाच्या किंवा इतर कोणत्याही महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. थेट कर्ज योजनेची कर्ज मर्यादा रु.१ लाखापर्यत असुन ही योजना कृषी संलग्न व पारंपारिक उपक्रम, लघु व मध्यम उद्योग, उत्पादन, व्यापार व विक्री सेवा क्षेत्रासाठी आहे. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा आणि तो विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील असावा. वय १८ ते ५५ वर्ष दरम्यान असावे. अर्जदाराचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे आवश्यक राहील. अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्र १. जात प्रमाणपत्र २. उत्पन्नाचा दाखला किंवा नॉन क्रिमिलेअर लेयर प्रमाणपत्र ३ रेशन कार्ड ४ रहिवासी प्रमाणपत्र ५ वयाचा पुरावा/ शाळेचा दाखला. ६ आधार कार्ड / पॅन कार्ड ७. व्यवसायाच्या अनुषंगाने कोटेशन आवश्यक राहील.

३) वैयक्तिक कर्ज व्याज परतफेड योजना (आय.आर १) ची कर्ज मर्यादा रु.१० लाखापर्यंत असुन ही योजना कृषी संलग्न व पारंपारिक उपक्रम, लघु व मध्यम उद्योग, उत्पादन, व्यापार व विक्री सेवा क्षेत्रासाठी आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थींचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.८ लाखाच्या मर्यादित असावे. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आणि विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील असावा वय १८ ते ५० वर्ष दरम्यान असावे. अर्जदाराचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य राहिल. अर्जदाराने महामंडळाच्या संगणक प्रणालीवर नाव नोंदणी करणे आवश्यक असेल. अर्जदार कोणत्याही बँकेच्या कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. अर्ज करतेवळी सदर प्रकल्पासाठी यापूर्वी महामंडळाच्या किंवा इतर कोणत्याही महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अर्जदाराचे कर्ज प्रकरण हे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) आणि तत्सम संगणक प्रणालीद्वारे प्रकरण हाताळण्यास सक्षम असलेल्या बँकेत केलेले असावे. कुटुंबातील एकावेळी एकाच सदस्याला कर्ज योजनेचा लाभ घेता येईल. लाभार्थ्याने मध्येच नियमित कर्जफेड नाही केली तर, व्याज परतावा दिला जाणार नाही. लाभार्थ्याने ऑनलाईन पोर्टलवर उद्योग सुरू असल्याचे किमान दोन फोटो उपलोड करणे बंधनकारक असेल.

४) गट कर्ज व्याज परतावा योजनेत (आय.आय.२) कर्ज मर्यादा रु. १० ते ५० लाखपर्यंत असुन ही योजना कृषी संलग्न व पारंपारिक उपक्रम, लघु व मध्यम उद्योग, उत्पादन, व्यापार व विक्री सेवा क्षेत्रासाठी आहे. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा आणि तो विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील असावा. वय १८ ते ४५ वर्ष दरम्यान असावे. अर्जदाराचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे आवश्यक राहील. अर्जदाराने महामंडळाच्या संगणक प्रणालीवर नाव नोंदणी करणे आवश्यक असेल. गटातील सर्व लाभार्थ्यांचे प्रमाणित वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु.८ लाखाच्या मर्यादित असावेत. या दोन्ही योजनचे वेबपोर्टलवर www.vjnt.in ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्र १. जात प्रमाणपत्र २. उत्पन्नाचा दाखला किंवा नॉन क्रिमिलेअर लेयर प्रमाणपत्र ३ रेशन कार्ड ४ रहिवासी प्रमाणपत्र ५ वयाचा पुरावा, शाळेचा दाखला. ६ आधार कार्ड, पॅन कार्ड ७. व्यवसायाच्या अनुषंगाने कोटेशन आवश्यक राहील. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) आफरीन अपार्टमेंट, रुम नं.२०१, नवली फाटक जवळ, साईकृपा सॉ मिल समोर, नवली रोड, जिल्हा पालघर-४०१४०४, येथे संपर्क साधावा मो. नं. ९९६७६६८२७८/७०४०३२१३८१ असे आवाहन वसंतराव नाईक विजाभज विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक (अ.का.) पोपट गिते यांनी केले आहे.

# राज्यातील १२० आश्रमशाळा, वसतीगृहांच्या इमारतींचे भूमीपूजन आणि लोकार्पण संपन्न

नंदुरबार/प्रतिनिधी

गेल्या दोन वर्षाच्या कार्यकाळात आदिवासी बांधकाम विभागाच्या माध्यमातून राज्यभरात ३ हजार ७५० कोटींच्या आश्रमशाळा, वसतीगृहांच्या इमारती बांधून आदिवासी विद्यार्थ्यांना या इमारतींमधून गुणवत्तापुर्ण आणि सोयीसुविधांनीयुक्त शिक्षण देण्याचे काम आदिवासी विकास विभागाने केले असल्याचे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ विजयकुमार गावित यांनी केले. आज नंदुरबारमधून राज्यातील १२० आश्रमशाळा, वसतीगृहांच्या इमारतींचे लोकार्पण, भूमीपूजन आणि पायाभरणी कार्यक्रमात गावित बोलत होते. शहरातील पटेलवाडी स्थित असलेल्या आदिवासी विकास विभागाच्या वसतीगृहाच्या प्रांगणगणातून आदिवासी विकासमंत्री यांच्या हस्ते राज्यातील २ हजार ३०० कोटी रुपये किमतीच्या १२० इमारतींचे दृरदृश्य प्रणालीद्वारे राज्यभरात भुमीपुजन, पायाभरणी आणि लोकार्पण सोहळा संपन्न झाला. यावेळी त्यांच्या समवेत जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित, दृकश्राव्य प्रणाली द्वारे आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, आयुक्त नयना गुंडे, बांधकाम विभागाचे मुख्य अभियंत्यांसह राज्यातील सर्व अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी सहाय्यक जिल्हाधिकारी अनय नावंदर, नंदुरबारचे प्रकल्प अधिकारी चंद्रकांत पवार, धुळ्याचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, आदिवासी बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता विजय पाटील, कार्यकारी अभियंता निरज चौरे आदिंसह विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी आणि वसतीगृहांचे विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मंत्री डॉ. गावित म्हणाले, आदिवासी विकास विभागाचा मंत्री झाल्यानंतर शिक्षण विभागात कशी सुधारणा करता येईल यासाठी योजनांचे काही नियोजनबद्ध आराखडे तयार करुन त्याच्या पुर्णत्वासाठी काम केले. आदिवासी बांधवांना जोपर्यंत शिक्षणाची सुविधा उपलब्ध होत नाही, त्याबद्दल जागृती होत नाही, आलेल्या संधीचा उपयोग आदिवासी बांधवाना घेत नाही तोपर्यंत आदिवासी विकास विभागाचा विकास होवू शकत नाही, त्यामुळेच शिक्षणाची अद्यायवत दालने आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उभी केली. आज राज्यातील आदिवासी विकास विभागाची ज्या ठिकाणी स्वमालमीची जागा उपलब्ध आहे त्या प्रत्येक ठिकाणी इमारतींना निधी उपलब्ध करुन दिले आहेत. आज राज्यात एकाच वेळी २ हजार ३०० कोटी रुपयांच्या १२० इमारतींचे भुमीपुजन आणि उद्घाटन आपण केले आहे. यातील ४६ इमारती या एकट्या नंदुरबार जिल्ह्यातील आहेत. तर या ४६ पैकी ३० इमारती ह्या अतिदुर्गम अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यातील असल्याने शेवटच्या माणसापर्यंत शिक्षणाच्या सुविधा पुरवण्याचा आमचा ध्यास असल्याचे यावेळी मंत्री डॉ.विजयकुमार गावित म्हणाले. महाराष्ट्राचा आदिवासी विकास विभाग निर्माण झाल्यानंतर एवढ्या मोठ्या प्रमाणात इमारतींवर पहिल्यांदा खर्च करण्यात येत आहे. या जिल्ह्यामधील विभागाच्या ९० टक्के इमारती बांधकामासाठी घेतल्या असून दहा टक्के राहीलेल्या इमारतीमध्ये या पुढच्या काळामध्ये आम्ही आश्रम शाळांमध्ये सर्व शिक्षक, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने बांधण्यात येणार आहेत. पुढील दोन वर्षामध्ये पूर्ण महाराष्ट्रामध्ये जिथे आश्रमशाळा आहे तिथे सर्व कर्मचारी, शिक्षकांची निवासस्थाने त्या ठिकाणी बांधून पुर्ण होतील, त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी त्या ठिकाणी चांगल्या रितीने फायदा होऊ शकेल. या सोबत विद्यार्थ्यांचे आत्महत्येचे प्रमाण पाहता विद्यार्थ्यांना समुपदेशन करण्यासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी काही संस्थासोबत करार देखील केला असल्याचे यावेळी मंत्री गावित यांनी सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर येण्यास विद्यार्थ्यांना मदत होणार आहे. विभागाच्या आश्रमशाळांमध्ये डिजीटल लायब्ररीची सोय उपलब्ध करुन दिली जाणार असून यातून विद्यार्थ्यांचे ज्ञान वृद्धींगत होण्यासोबतच त्याच्या शंकेचे निरसरण देखील होणार आहे. राज्य शासनाने मुलींच्या मोफत शिक्षणाचा निर्णय घेतला आहे. मात्र आदिवासी विद्यार्थीनी ह्या खऱ्या अर्थाने भाग्यवान असून त्यांना याआधीच आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच विभागाच्या वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना स्वयंम् योजनेतून देखील आर्थिक मदत देण्याचे काम विभागाकडून केल्या जात आहे. विभागाने काही विषय तज्ञ शिक्षकांची विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी निवड देखेली केली आहे. सुट्टीच्या दिवशी हे विषय तज्ञ ऑनलाईन पद्धतीन आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षीत करण्याचे काम करणार असल्याचे देखील यावेळी मंत्री डॉ विजयकुमार गावित यांनी सांगितले. पाचवीपासूनच काही गुणवंत विद्यार्थ्यांना नियमित शिक्षणासोबत स्पर्धा परिक्षांसाठी तयार केले जाणार असून याचा फायदा त्यांना स्पर्धा परिक्षांमध्ये होणार असल्याचे देखील यावेळी ते म्हणाले. राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांची क्रीडा क्षेत्रातील अभिरुची पाहता आदिवासी विकास विभागातील प्रत्येक अप्पर आयुक्तांच्या कार्यक्षेत्रात एक स्वतंत्र खेळाडूंची आश्रमशाळा तयार करुन याठिकाणी आदिवासी खेळाडू विद्यार्थ्यांना त्याच्या अभिरुचीच्या खेळात प्रशिक्षित करण्याचा निर्णय देखील विभागाने घेतला असल्याचे यावेळी मंत्री डॉ. विजयकुमार गावित म्हणाले. यासोबत १ हजार ४९७ क्रिडा, कला, संगणक शिक्षकांच्या भरतीसही मान्यता देण्यात आली असून एक दोन दिवसात त्यांच्या भरतीची जाहिरात निघणार असल्याचे सांगत विभागात मागच्या काळातील ८३५ क्रीडा शिक्षकांना मान्यता देण्याचे निश्चित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. आदिवासी विकास महामंडळ आणि शबरी वित्तीय महामंडळाला यंदा आदिवासी विकास विभागाने ५० कोटीं दिले असून यातून आदिवासी बांधवांना उद्योग धंदे, विविध व्यवसाय सुरु करण्यास चालना मिळणार आहे. पेसा उपयोजना क्षेत्राची ४० वर्षानंतर पुर्नरचना करुन राज्य सरकारने त्याला मान्यता देत राष्ट्रपतींकडे मान्यतेसाठी पाठविल्याचे देखील मंत्री डॉ. विजयकुमार गावित म्हणाले. जिल्ह्यातील १६ सोंगाड्या पार्टीना प्रोत्साहण देण्यासाठी त्यांना साहीत्य खरेदी करण्यासाठी मदतनिधी दिला आहे. सोंगाड्याच्या माध्यमातून संस्कृती टिकण्यासोबत समाज प्रबोधनाचे काम देखील होणार असल्याचे मंत्री डॉ. गावित यावेळी म्हणाले.

यावेळी बोलतांना जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ. गावित यांनी विद्यार्थ्यांना विभागाच्या विविध योजनेच्या माध्यमातून गुणवत्ता पुर्ण शिक्षण घेवून जिल्ह्याचे आणि समाजाचे नावे उंचावण्यासाठी ध्येय बाळगण्याचे आवाहन केले. आदिवासी विकास विभागामार्फत पहिल्यांदाच अशा पद्धतीने दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून इतक्या मोठ्या प्रमाणात भुमीपुजन आणि लोकार्पण सोहळा होत असल्याने आदिवासी विकास विभाग विकासाची कास धरत असल्याचे हे उदाहरण असल्याचे डॉ. गावित म्हणाल्या.

# अशोका विजयादशमी...!

कलिंगच्या युध्दात एक लाख लोक मारले गेले दिड लाख कैद झाले आणि कित्येक जखमी झाले. आकाशात गिधाडाने गर्दी केल्याने रणभूमीवर अंधार झाला. अशावेळी श्रमण निग्रोध हे रणभूमीकडे निघाले. तेंव्हा अशोकान त्यांना बोलावले त्यांनी युध्द का केले असे विचारले त्यावर नापसंती व्यक्त केली. भंते उपगुप्तांनी सम्राट अशोकाला धम्मपदातील अहिंसायावर सांगितले. तेंव्हा महान चक्रवर्ती सम्राट अशोकाचे मनाचे परिवर्तन झाले. त्यानंतर महास्थवीर मुगलीपुत्त यांच्या समोर सम्राट अशोकाने तलावार म्यान केली. व बौध्द धम्माची दिक्षा घेतली आणि यापुढे कधीच युध्द करणार नाही अशी प्रतिज्ञा केली. युध्द न करण्याची प्रतिज्ञा करणारा अशियाखंडातला हा एकमेव चक्रवर्ती होय. अशा तर्हेने ज्यादिवशी अशोकाने तलावर म्यान केली तो दिवस म्हणजे अशोका विजयादशमी. यामुळे सम्राट अशोकाने हिंसेवर अहिंसेचा अन्यायावर न्यायाचा रागावर प्रेमाचा आणि असत्यावर सत्याचा विजय मिळविला. म्हणून म्हणतात जेवढे पृथ्वीचे वजन तेव्हढे अशोकाचे वजन तेंव्हा अशोकाने बौध्द धम्माचा स्विकार करून आपले सर्वस्वी धम्माला दान केले. एक कोटी सुवर्ण मुद्रा दान केले. याला सोने लुटने असे म्हणतात. तर आपला मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा यांना बौध्द धम्माच्या प्रचारासाठी श्रीलंकेत पाठविले. तेथून बौध्द धर्म सार्या जगात पोहलचा. आज अनेक देशात बौध्द धम्माचा प्रभाव आहे. म्हणून जगात सर्वात चांगला धर्म बौध्द धम्म आहे. असे महान अभ्यासक स्वामी विवेकानंद म्हणतात आणि ते खरेच आहे. जगात भारताला बुध्दाचा देश म्हणूनच ओळखतात अशा या विज्ञानवादी धम्मामुळेच जगाचा उध्दार होणार आहे. काही लोक बुध्दाला अवतारी म्हणतात अवतार माणने हा त्यांचा गौरव नसून अपमान आहे-डॉ.आ.ह.साळुंखे (सर्वोत्तम भूमीपुत्र गौतम बुध्द पान.४७) या महान देशात तीनवेळा धम्मचक्राला गती देण्यात आली. धम्मचक्र प्रवर्तन झाले पहिले सारनाथ या ठिकाणी महाकारूणिक तथागत बुध्दांनी पहिले धम्मचक्र प्रवर्तन केले. आणि पंचशिला सांगितले. त्यानंतर सम्राट अशोकाने पाटना याठिकाणी दुसर्यांदा धम्मचक्र प्रवर्तन केले व दहा नियम सांगितले. तर राष्ट्रनिर्माते संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर याठिकाणी नागनदीकाठी तिसर्यांदा धम्मचक्र प्रर्वतन केले. आणि बावीस प्रतिज्ञा दिल्या. कोंबडी ज्याप्रमाणे पिलांना पंखाखाली घेते तसे बौध्दधम्मांनी सार्या जगाला पंखाखाली घेतले. म्हणून जगात युध्द नको बुध्द हवा म्हटले जाते. तेंव्हा अशोका विजयादशमी म्हणजे जगातला महान उत्सव होय. यालाच दसरा म्हंटले गेले. जेंव्हा माणून चंद्रावर जाईल तेथे सुध्दा हा महान उत्सव साजरा होईल असा हा विश्वव्यापी अशोका विजयादशमी आहे.

**- श्रामणेर पी.एस.कांबळे, कसगी, ता.उमरगा, जि.धाराशिव (९७६४१२११३३)**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# भाईंदरमध्ये प्रेमसंबंधाला धार्मिक वळण तरुणाला मारहाण, दुकानाची तोडफोड





**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

भाईंदरमध्ये एका जोडप्याच्या प्रेमसंबंधाला धार्मिक वळण मिळाल्याने तणाव निर्माण झाला होता. या तरुणाने अल्पवयीन तरुणीला फूस लावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप करून जमावाने त्याला मारहाण करत त्याच्या दुकानाची तोडफोड केली. या प्रकरणाला धार्मिक वळण लागल्याने मोठा तणाव निर्माण झाला होता. अखेर भाईंदर पोलिसांनी मध्यरात्री २४ वर्षीय तरुणाला अटक केली आहे. भाईंदरच्या केबिन रोड परिसरात २४ वर्षीय तरुणाचं एक दुकान आहे. त्याचे १७ वर्षीय तरुणीशी प्रेमसंबंध होते. तो रात्री तिला भेटायला दुकानात बोलवत असे. दुकानाचे पुढील दार बंद करून तो तिला मागच्या दाराने बोलवत होता. याची कुणकुण मंगळवारी नागरिकांना लागली. नागरिकांनी या तरूणाला त्याला धरून चोप दिला. तरुण आणि तरुणी भिन्न धर्मीय असल्याने ही गोष्ट वार्यासारखी पसरली आणि धार्मिक संघटनेसह मोठा जमाव जमला. संतप्त झालेल्या जमावाने बाहेरूनच दुकानाची तोडफोड केली. माजी आमदार नरेंद्र मेहता, आमदार गीता जैन हे देखील मध्यरात्री घटनास्थळी पोहोचले. नवघर पोलिसांनी या तरुणाला ताब्यात घेतले. मात्र पीडित तरुणी तक्रार देण्यास तयार नव्हती. अखेरीस तिचे मन वळिवण्यात आले आणि तिच्या तक्रारीवरून नवघर पोलिसांन रात्री उशिरा आरोपी तरूणाविरोधात बालकांचे लैंगिक अत्याचार विरोधी कायदा पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. आम्ही आरोपीला अटक केली असून परिस्थिती नियंत्रणात आहे, अशी माहिती नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक धीरज कोळी यांनी दिली.

# विहिरीत उडी मारून आठ वर्षीय मुलाची आत्महत्या!

**भाईंदर/प्रतिनिधी**

आईने दुसरे लग्न केल्याच्या नैराश्यातून आठ वर्षीय मुलाने मंगळवारी सकाळी साडेसात वाजता विहिरीत उडी मारून आत्महत्या केली आहे. आठ वर्षीय मुलाला उत्तन येथील अनाथश्रमात सोडले होते. त्यानंतर त्याने विहिरीत उडी मारून आत्महत्या केली आहे. मागील महिन्यात आई भेटायला आली असता मला घेऊन चल आई, मला इथे नाही राहायचं असे तो आई आणि संस्थेच्या लोकांना सांगत होता. मात्र आईने दुसरे लग्न केले होते आणि ती नालासोपारा येथे राहत असल्याने तिने मुलाला सोबत ठेवणे नाकारले. त्यामुळे आई घेऊन जात नाही आहे म्हणून रात्री सर्व झोपी गेल्यानंतर बाजूला असलेल्या विहिरीत उडी मारून मुलाने आपला जीव संपवला आहे. या संस्थेत अनाथ लहान मुलांचे संगोपन केले जाते. काही महिन्यांपूर्वीच मुलाला संस्थेत दाखल केले होते. तो इतर २१ लहान मुलांसोबत तो संस्थेत राहायला होता. मंगळवारी सकाळी उठल्यानंतर कुठेच मिळून न-आल्याने त्याचा शोध घेतला असता तो विहिरीत पडलेला आढळला. तेव्हा तिथल्या लोकांनी याची माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलीस आणि अग्निशमन विभाग हे घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी तो मृतदेह बाहेर काढला.या घटनेची माहिती मिळताच भाईंदर विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्त दिपाली खन्ना आणि उत्तन सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादाराम करांडे यांनी घटनास्थळाला भेट दिली. सदरील अकस्मात मृत्यूच्या नोंदीचा तपास सहायक पोलीस निरीक्षक सपन बिश्वास हे करत आहेत.

# सातपाटी येथे मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण आणि रेबीज लसीकरण मोहिमेचा शुभारंभ!



**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हयातील श्वानदंशच्या वाढत्या घटना व जीवघेणे हल्ले, तसेच भटक्या कुत्र्यांच्या दहशतीने जिल्यातील बऱ्याच ग्रामपंचायत त्रस्त असल्याने त्यांचे नियंत्रण व बंदोबस्त करण्या करीता वारंवार होत असलेल्या मागणीच्या अनुषंगाने कृषी व पशु संवर्धन सभापती संदिप पावडे यांनी विशेष प्रयत्न करून मागील वर्षी जिल्हा परिषदेमार्फत मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण आणि रेबीज लसीकरण ही मोहीम राबवली. अशी मोहीम राबवणारा पालघर जिल्हा हा महाराष्ट्रातील पहिला जिल्हा असून गेल्यावर्षी या मोहिमेला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे यावर्षी देखील ही मोहीम राबवण्यात आली आहे. याचा शुभारंभ आज सातपटी ग्रामपंचायत येथून करण्यात आला. कृषी व पशुसंवर्धन सभापती संदीप पावडे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शिंदे, जिल्हा पशुसंवर्धन आयुक्त भुवनेश्वर बोरकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रकाश हसनाळकर, पशुसंवर्धन समिती सदस्य ज्योती पाटील, करिष्मा उमतोल, सीमा रावते, कली वळवी, सरपंच सीमा भोईर, पंचायत समिती सदस्य हर्षदा तरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. जिल्हा परिषद निधीतुन गत वर्षी या उपक्रमासाठी २५ लक्ष रुपये चा निधी उपलब्ध मंजूर करण्यात आला होता, परंतू ही मोहीम राबवण्यासाठी ग्राम पंचायत कडून होत असलेल्या मागणी नुसार आणि मोहिमेचे फायदे लक्षात घेता या वर्षी ८० लाखाची तरतूद या मोहिमेसाठी ठेवण्यात आली आहे. सातपाटी, शिरगाव, माहीम, केळवे, अर्नाळा या ग्रामपंचायत मधे यावर्षी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. ही मोहीम राबवण्यासाठी सातपाटी ग्रामपंचायतीने नियमित पाठपुरावा केला असून ही मोहीम यशस्वी करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे असेल यात शंकाच नाही, तसेच पुरेसा निधी उपलब्ध झाल्यास जिल्हाभरात देखील ही मोहीम यशस्वीपणे राबवता येईल, असे प्रतिपादन कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती संदीप पावडे यांनी केले. अति. मुख्य कार्यकारी रवींद्र शिंदे यांनी पशुसंवर्धनमार्फत राबवली जाणारी ही मोहीम कौतुकास्पद असून संबंधित ग्रामपंचायतीचे सहाय्य लाभल्यास आणखी प्रभावीपणे जिल्हा परिषदेमार्फत यावर काम करता येईल असे मत यावेळी व्यक्त केले. यावेळी ग्रामसेवक विपीन पिंपळे, तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ. राहुल संखे,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांचे विशेष योगदान लाभले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. सातपाटी ग्रामपंचायत मार्फत या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# कुडुस ग्रामपंचायत उपसरपंच पदी मुदत्सर पटेल यांची बिनविरोध निवड



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील कुडुस ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी मुदत्सर पटेल यांची बिनविरोध निवड झाली असून त्यांच्यावर निवडीबद्दल अभिनंदनचा वर्षाव होत आहे. सरपंच राजेंद्र जाणू कोगिल यांच्या उपस्थितीत उपसरपंच पदाच्या निवडणुकीत मुदत्सर पटेल यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांना बिनविरोध घोषित करण्यात आले. या वेळी ग्रामपंचायत सदस्य कुडुस विकास आघाडीचे शिलेदार व मतदार यांच्या शुभहस्ते मुदत्सर पटेल यांना सन्मानित करण्यात आले. तसेच सरपंच राजेंद्र कोगील, माजी उपसरपंच गिरीष चौधरी, अंजली चौधरी, कादंबरी चौधरी परिणीती जाधव, सोनी बरफ़, सोनू पवार, नारायण मराड, विशाल गवते यांच्या हस्ते मुदत्सर पटेल यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायतचे सदस्य व नागरिक उपस्थीत होते.

# वसई-विरार महापालिकेत 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' साजरा



**विरार/प्रतिनिधी**

दरवर्षी १० ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' म्हणून साजरा केला जातो. यावर्षीची थीम 'चशपींरश्र क्शरश्रींह रीं थींज्ञ झश्ररलश' असून कामाच्या ठिकाणी तणाव निर्माण होणे व यामुळे मानसिक आजार आणि कर्मचाऱ्यांच्या जीवनावर होणारे परिणाम याकरिता मानसिक आरोग्याच्या समस्येबाबत जागरुकता निर्माण होणे आवश्यक आहे. याअनुषंगाने वसई विरार महापालिका, मुख्यकार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचेमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्येबाबत जागरुकता निर्माण करणे करिता आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनाने आणि मा. अतिरिक्त आयुक्त, संजय हेरवाडे यांचे पुढाकाराने दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता महासभा हॉल, मुख्यालय, विरार (प.) येथे आरोग्य शिबीर आयोजि करण्यात आले होते. सदर आरोग्य शिबीरास मार्गदर्शन करणेकरिता मानसोपचार तज्ज्ञ डॉ. सुरेश पाटील, अध्यक्ष-नालासोपारा मेडिकल असोसीएशन उपस्थित होते. त्यांनी पालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानसिक आरोग्य विषयी कामाच्या ठिकाणी येणारा तणाव, वैयक्तिक जीवानातील नैराश्य, चिंता इत्यादींचे व्यवस्थापन कसे करावे? आणि जीवनशैलीतील बदल, व्यायाम, वाचन, फिरायला जाणे, पोषक आहार इत्यादी गोष्टीमुळे तणाव सहज नियंत्रणात आणले जाऊ शकतो असे मोलाचे मार्गदर्शन दिले. या आरोग्य शिबीरास समीर भूमकर मा. उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य), सदानंद पुरव, मा. उपायुक्त (आस्थापना), डॉ. भक्ती चौधरी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, दिलीप पालव, मुख्य अग्निशमन अधिकारी तसेच विभाग प्रमुख व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# भिवंडीत मार्कंडेय महामुनी वाचनालय समिती कडून मुलांना शैक्षणिक मदत



**भिवंडी/प्रतिनिधी**

शहरातील पद्मानगर येथील श्री मार्कंडेय महामुनी वाचनालय समिती व बालाजी व्यायाम शाळा यांच्या वतीने भारतीय जनता पार्टी भिवंडी पूर्व विधानसभा निवडणूक प्रमुख संतोष शेट्टी यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम आयोजित करून साजरा करण्यात आला.या कार्यक्रमात गरीब गरजू महिलांना शिवणयंत्र तसेच परिसरातील दहा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षासाठी आर्थिक मदत देऊन सहकार्य करण्यात आले. याप्रसंगी बाले श्रीनिवास,आडेप श्रीनिवास,ईश्वर पामु, सत्यनारायण मंचिकटला व स्थानिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी नवरात्रीनिमित्त महिलां साठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे सुध्दा आयोजन करण्यात आले होते.

# ९ लाखांची घरफोडी करणाऱ्या आरोपीला दोन तासांतच अटक

**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**



भाईंदर पूर्वेला नवघर पोलीस ठाणे हद्दीतील इंद्रलोक फेस-४ येथे ३ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते रात्री ९ वाजण्याच्या दरम्यान दागिने लंपास झाले होते. यावरून घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरील गुन्ह्याचे गांभीर्य समजून नवघर पोलिसांनी तात्काळ तो गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश गुन्हे प्रकटीकरण पथकाला दिले होते. त्यानुसार पोलिसांनी तांत्रिक तपास करून मुद्देमाल हस्तगत करत आरोपीला अटक केली आहे. नवघर पोलीस ठाणे हद्दीत तक्रारदार अमित मंडल यांच्या घरात ३ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता ९ च्या दरम्यान घरातील पोटमाळ्याच्या सिलींगच्यावर ठेवलेले ९ लाख ७ हजार ४० रुपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेले. त्याठिकाणाहून तांत्रिक पध्दतीने तपास करत आरोपी आकाश कन्हैयालाल गुप्ता याला ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर आरोपीला ताब्यात घेवून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम मालमत्ता हस्तगत करत अटक केली. त्यानंतर ठाणे न्यायालयात हजर केले असता ८ सप्टेंबर रोजीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. सदरची कामगिरी ही पोलीस आयुक्त मधुकर पांडे, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त विजयकुमार मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक धिरज कोळी, पोलीस निरीक्षक अशोक कांबळे, सहायक पोलीस निरीक्षक अमोल तळेकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर आसबे, पोलीस हवालदार संतोष पाटील, भूषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, जयप्रकाश जाधव, पोलीस शिपाई ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, संकेत मगर, नवनाथ पवार, उमेश अस्वार तसेच मसुब कुणाल हिवाळे यांनी केलेली आहे.

# नवरात्रौ उत्सवानिमीत्त शरद नगरमध्ये कुमारीकांचे पुजन; आदर्श सोहळा



**वाडा/प्रतिनिधी**

उमा, गौरी, पार्वती, जगदंबा ही देवीची सौम्य रूपं. दुर्गा, काली, चंडी, भैरवी व चामुंडा ही देवीची उग्र रूपं. ही देवीची शक्तीरुपं सर्वभूत आहेत. बालिका, कुमारीका, युवती, प्रेमिका, अभिसारीका, पत्नी, गर्भधारीणी, जन्मदा, संहिता, पालक, पोषीता, गृहस्वामिनी, अभद्रसंहारीणी अशा विविध जीवनकला साकारणारी स्वअस्तीत्व सिद्ध करणारी ही देवता. ही सारी पार्वतीची रूपं म्हणजे स्त्रीरूपांतील तिचं अस्तीत्व. म्हणूनच नवरात्रीला देवी पार्वतीच्या या सर्व रूपाचं पुजन करण्याची आपली परंपरा व संस्कृती. या संस्कृतीचं जतन दरवर्षी वाडा तालुक्यातील शरद नगर मधे मोठ्या थाटामाटात व उत्साहात केले जाते. यावर्षी नवरात्रीच्या सातव्या दिवशी बुधवार दि. ९ ऑक्टोबर रोजी स्वप्नपूर्ती गणपती बाप्पा मंदिरामधे शरद नगर मधील सर्व कुमारीकांचे विधीवत पुजन करून त्यांना भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. जय जिजाऊ महिला मंडळाच्या महिलांनी सर्व कुमारीकांचे पुजन केले. शरद नगर मधे सर्व सण व उत्सव मोठ्या भक्तीभावाने व पारंपारीक पद्धतीने साजरे होतात. संस्कृती व परंपरा पाळणारे शरद नगर म्हणून या नगराची विशेष ओळख आहे. नवरात्रीत सर्व स्त्री-पुरुष, मुलं-मुली, लहान-थोर एकत्र येऊन सण-उत्सव साजरे करतात. यावर्षीही शरद नगरमधे मोठ्या धुमधडाक्यात नवरात्र उत्सव सुरू झाला आहे. नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी स्वप्नपूर्ती बाप्पा मंदिरामधे घटस्थापना करण्यात आली. त्यानंतर विविध स्वरूपाच्या स्पर्धा व प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्यात आले. त्यामधे महिलांची संगीत खुर्ची ही स्पर्धा विशेष नाविण्यपूर्ण झाली. नगरातील सर्व महिलांनी भाग घेतला होता. रात्री ८ ते १० वाजेच्या दरम्यांत गरबा खेळाचे आयोजन करण्यात आले होते. या खेळामधे सहभागी झालेल्या महिलांसाठी लकी ड्रॉ काढला जातो व पैठणी बक्षिस दिली जाते. नऊ दिवस सतत पैठणीचा लकी ड्रॉ महिलांसाठी काढला जातो तर मुलांसाठीही लकी ड्रॉ काढून आकर्षक बक्षिसे दिली जातात. नवरात्रीचे नऊ दिवस सतत विविध स्वरूपाचे कार्यक्रम शरद नगरमधे साजरे होणार असल्याची माहिती नवरात्र उत्सव मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र भानुशाली यांनी दिली.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, पालघर**

**ई-निविदा सूचना क्रमांक १०१ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, पालघर हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील **सुशिक्षित बेरोजगार अभियंता** यांच्याकडून मागवित आहेत. कोरे निविदा संच निविदा उपलब्ध कालावधी दि. ११/१०/२०२४ ते १८/१०/२०२४ सकाळी ११.०० ते संध्या. ५.४५ वाजेपर्यंत (www.mahapwd.gov.in) या संकेतस्थळावर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहतील. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर हे भरन पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

फटिप : सदर निविदा सूचनेमध्ये एकूण १० (दहा) कामे समाविष्ट आहेत. या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1) www.mahapwd.gov.in 2) http://www.paytopwd.gov.in

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष जी.एस.टी.वगळून | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १. | वेवजी काटेलपाडा येथे पाईप मोरी बांधणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८०५७९३/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| २. | वेवजी गोरखनपाडा रस्ता तयार करणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८२४८०१/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| ३. | घिमानिया शिपाईपाडा येथे रस्ता तयार करणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८१३०७८/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| ४. | कोचाई बडगापाडा रस्ता तयार करणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८१३०७८/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| ५. | वडवली ते भोजपाडा रस्ता तयार करणे. ता. तलासरी, जि.पालघर | रु. ८०५३२७/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| ६. | वडवली ते हडपाडा रस्ता तयार करणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८१५७६६/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| ७. | वडवली डोंगरीपाडा येथे रस्ता तयार करणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८१३९९९/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| ८. | उपलाट धोधडपाडा रस्ता तयार करणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८१३०७८/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| ९. | उपलाट पाटीलपाडा रस्ता तयार करणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८१३०७८/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |
| १०. | वसा ब्राम्हणपाडा येथे संरक्षक भिंत बांधणे. ता. तलासरी, जि. पालघर | रु. ८३२९१६/- | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४ Trible |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. ११/१०/२०२४ ते दि. १८/१०/२०२४ पर्यंत

ई-निविदा उघडणे - दि. २१/१०/२०२४ सकाळी ११.०० नंतर शक्य झाल्यास.

**जा.क्र. सा.बां.वि./पालघर/निविदा/१०३५०**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय

सा.बां. विभाग, पालघर

बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालयाशेजारी,

पालघर-बोईसर रोड, ता.जि. पालघर (पश्चिम) - ४०१ ४०४.

दिनांक : ०९/१०/२०२४

**सही/-**

**(स.प्र. पाटील)**

कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर

**विमाका/कोवि/२०२४-२०२५/१९८**

पान १ वरून....

## प्रेमाच्या त्रिकोणात एक फूल दो माली...

त्यांना करिश्मासाठी योग्य वाटले. त्यामुळे त्यांनी तिचे लग्न त्या तरुणासोबत मोठ्या थाटामाटात लावून दिले. सामाजीक आणि कौटूंबिक जाणीवेतून मुलीचे लग्न योग्य वयात होणे गरजेचे असते या विचारातून करिश्माच्या आई वडीलांनी तिचे लग्न विनाविलंब लावून दिले. विवाहानंतर करिश्मा आपल्या पतीसहसंसार करु लागली. विवाहानंतर करिश्माचे सुखाचे दिवस सुरु होते. बघता बघता करिश्माच्या संसार वेलीवर तिन अपत्यांचे आगमन झाले. तिचा संसार भरला आणि बहरला. तिन मुलांची आई असलेली करिश्मा वयाने एकदम तरुण आणि दिसायला देखणी होती. टीव्हीवर दिसणा-या साबणाच्या जाहीरातीमधील आईची भुमिका करणा-या मॉडेलप्रमाणे तिचे सौंदर्य खुलले होते. करिश्मा रहात असलेल्या गावातच धर्मेंद्र (काल्पनिक नाव) रहात होता. धर्मेंद्र यास मोबाईलमधील विविध प्रकारचे अॅ(प हाताळण्याचा छंद होता. केवळ बारावी पास असलेला धर्मेंद्र जणूकाही मोबाईलपटू होता. व्हाटसअॅरप, फेसबुक, इंस्टाग्राम आणि विविध मोबाईल ऑप लिलया हाताळण्यात त्याचे दिवसाचे कित्येक तास सहज निघून जात होते. ४ मार्च हा दिवस धर्मेंद्र साठी हॅपी बर्थ-डे असतो. दोन वर्षापुर्वी या दिवशी त्याला त्याच्या इंस्टाग्राम अकाऊंटवर गावातील करिश्माकडून हॅपी बर्थ-डे शुभेच्छा आल्या. गावातील करिश्माने आपल्याला वाढदिवसाच्या शुभेच्छा पाठवल्याचे बघून धर्मेंद्रची कळी खुलली. त्याने लागलीच तिला आभाराचा रिप्लाय दिला.त्या दिवसापासुन धर्मेंद्र आणि करिश्माया दोघांच्या मैत्रीचा प्रवास सुरु झाला. दोघांच्या मैत्रीच्या प्रवासाची गाडी एक एक स्टेशन पुढे पुढे धावू लागली. मॅसेजने सुरु झालेली दोघांची मैत्री नंतर मोबाईलवरील व्हाईस कॉल अर्थात संभाषणात परावर्तीत झाली. बघता बघता दोघांची मैत्री फुल क्रिम मिल्कच्या सायीप्रमाणे घट्ट होत गेली. त्यानंतर दोघे एकमेकांना प्रत्यक्ष भेटू लागले. दोघे एकमेकांसोबत मोबाईलमधे फोटो देखील काढू लागले. सुरुवातीला पॅसेंजर ट्रेनच्या गतीने सुरु झालेली त्यांची प्रेमकथा नंतर सुपरफास्ट मेल एक्सप्रेसच्या गतीने धावत हिट झाली. इश्क और मुश्क छुपाये नही छुपता असे कुणीतरी म्हटले आहे. कस्तुरीमृगाच्या नाभीतून पसरणा-या सुगंधाप्रमाणे त्यांच्या लव्ह स्टोरीचा सुगंध अख्ख्या गावात दरवळू लागला. त्यांची लव्ह स्टोरी त्या गावात एक चर्चेचा विषय झाली. त्या लहानशागावातील रहिवाशांच्या जिभेवर करिश्मा आणि धर्मेंद्र यांच्या प्रेमकथेची चर्चा कॅडबरीप्रमाणे चघळली जाऊ लागली. धर्मेंद्रचे प्रेमप्रकरण हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच त्याच्या आईवडीलांनी त्याच्यासाठी वधू संशोधनाचे काम सुरु केले. धर्मेंद्रच्या करिश्मावरील प्रेमाच्या लाटा अजून उसळण्यापुर्वी त्याचे लग्नउरकण्यासाठी त्याचे आई वडील सक्रिय झाले. त्यांनी त्याच्यासाठी वधू संशोधनाच्या कामाला तेज धार लावली. अखेर धर्मेंद्रसाठी एक स्थळ निश्चित झाले. त्या स्थळासाठी त्याच्या आईवडीलांनी यशस्वी बोलणी केली. लवकरच त्याचा साखरपुडा करण्याचे देखील नियोजन झाले. या गोष्टीची भनक करिश्माला लागली. अगोदरच विवाहीत आणि पतीपासून तिन मुले असलेली करिश्मा अविवाहीत धर्मेंद्रच्या प्रेमात पडली होती. वास्तविक तिला तिचा संसार होता. आपल्या संसाराकडे प्रामाणीकपणे लक्ष देणे तिचे काम होते. मात्र असे असतांना देखील ती धर्मेंद्रच्या प्रेमात आकंठ बुडाली. काही महिन्यापुर्वी धर्मेंद्रचा साखरपुडा ठरला असल्याचे समजताच ती त्याच्यावर चिडली. तिने थेट त्याचे घर गाठले. गेल्या दोन वर्षापासून आपले एकमेकांवर प्रेम आहे. त्यामुळे मी तुझे लग्न होऊ देणार नाही असे तिने त्याला खडसावत एक प्रकारे गर्भीत धमकीच दिली. बराच वेळ वाद घातल्यानंतर ती आपल्या घरी निघून गेली. एके दिवशी करिश्माने धर्मेंद्रच्या भावी पत्नीचा मोबाईल क्रमांक आणि पत्ता शोधून काढला असे सांगितले जाते. त्याच्या भावी पत्नीच्या नातेवाईकांना करिश्माने तिचे आणि धर्मेंद्रचे एकत्रीत काढलेले फोटो पाठवल्याचे देखील म्हटले जाते. त्यामुळे धर्मेंद्रचा होऊ घातलेला साखरपुडा मोडल्याची चर्चा होती. या सर्व घडामोडींचा परिपाक म्हणून धर्मेंद्रला करिश्माचा राग आला. त्या रागाच्या भरात अथवा अन्य काही गोष्टींमुळे धर्मेंद्र तिच्यावर चिडला होता. चिडलेल्या धर्मेंद्रने तिला समजावण्याचा प्रयत्न केला असता करिश्माने त्याला शिवीगाळ सुरु केली. शब्दामागे शब्द वाढत होता. धर्मेंद्रचा संयम सुटला त्यामुळे त्याने तिला मारहाण केली. या शिवीगाळ आणि मारहाणीतून करिश्माने धर्मेंद्रविरुद्ध भुसावळ तालुका पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. त्यानंतर काही दिवस असेच निघून गेले. सुरुवातीचे काही दिवस दोघांनी एकमेकांसोबत अबोला धरला. पुन्हा काही दिवसांनी दोघांमधे प्रेमाचा अंकुर फुलला आणि त्यांचा अबोला सुटला. दोघे पुर्वीसारखे एकमेकांसोबत गुलुगुलू बोलू लागले आणि खुदूखुदू हसू लागले. मात्र करिश्मा आणि धर्मेंद्रचे प्रेमसंबंध सा-या गावात जाहीर झाले होते. तसेच दोघांच्या प्रेमाची ख्याती करिश्माच्या पतीसह नातेवाईकांपर्यत पोहोचली. आपली पत्नी गावातील धर्मेंद्रच्या प्रेमात पडल्याची माहिती करिश्माच्या पतीला समजल्यानंतर तो मनाने व्यथीत झाला. मात्र आपल्या संसाराचे हित लक्षात घेत त्याने तिला समजावण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. मात्र त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले. अखेर तो एकटाच आपल्या आई वडिलांकडे राहण्यास निघून गेला. पती आपल्याला सोडून गेल्याचे बघून करिश्मा तिघा मुलांच्या साथीने स्वतंत्र राहू लागली. त्यामुळे धर्मेंद्र आणि करिश्मा या दोघांना एकमेकांनाभेटण्यासाठी रान मोकळे झाले. एके दिवशी धर्मेंद्र हा करिश्मा सोबत बोलत बसला होता. त्यावेळी त्याने तिचा मोबाईल तपासला. तिच्या मोबाईलच्या फेसबुक मॅसेंजर चॅटमधे गावातीलच जितेंद्र (काल्पनिक नाव) नावाच्या तरुणाचे चॅट त्याला बघण्यास मिळाले. त्यावर त्याने तिला विचारणा केली. त्यातून दोघांमधे वाद निर्माण झाला. करिश्मा आपल्या व्यतिरिक्त जितेंद्र सोबतदेखील प्रेमसंबंध ठेवत असल्याचे समजल्यानंतरधर्मेंद्र मनाने खचला. त्यातून दोघांमधे वादाची ठिणगी पडली. करिश्मा आपल्यासोबत बोलते आणि जितेंद्र सोबत राहते हे बघून धर्मेंद्रला तिचा राग आला.एकदारात्रीच्या वेळी करिश्मा नटून थटून प्रणयी स्वरुपातील वस्त्र परिधान करुन जातांना धर्मेंद्रने पाहिले. एवढ्या रात्री करिश्मा नटून थटून कुठे जात आहे हा प्रश्न त्याला पडला. त्याने तिची वाट अडवून तिला तु एवढ्या रात्री कुठे जात आहे अशी विचारणा केली. त्यावर तीने त्याला असमाधानकारक उत्तरे देण्यास सुरुवात केली. तिचे वर्तन आणि वक्तव्य योग्य नसल्याचे बघून धर्मेंद्रने तिला समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र आता ती नव्याने मित्र झालेल्या जितेंद्रच्या नादी लागली होती. त्यामुळे तिला आता धर्मेंद्र नकोसा झाला होता. दोघांमधे जोरजोरात शिवीगाळ सुरु झाली. दोघांच्या भांडणाचा आवाज ऐकून तिचा नवा प्रेमी जितेंद्र त्याठिकाणी धावत आला. करिश्मा आपले ऐकत नसल्याचे बघून संतप्त धर्मेंद्रने चाकूचे वार करिश्माच्या पाठीवर, पोटाच्या बाजूला आणि उजव्या हातावर केले. या चाकू हल्ल्यात जखमी करिश्मा जमीनीवर कोसळली. करिश्मा चाकू हल्ल्यात जखमी झाल्याचे बघून तिचा बचाव करण्यासाठी जितेंद्र धावून आला. तु आमच्या मधे पडू नको, नाहीतर तुला देखील मारुन टाकेन असे धर्मेंद्रने जितेंद्र यास धमकावले. या चाकू हल्लूयात जितेंद्रच्या उजव्या हाताच्या बोटाला दुखापत झाली. दरम्यानच्या कालावधीत काही गावकरी जमा झाले. मात्र धर्मेंद्रच्या हातातील चाकू बघून कुणीही पुढे येण्यास धजावला नाही. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या करिश्माला गावातील एका सुज्ञ नागरिकाने त्याच्या चारचाकी वाहनाने दवाखान्यात दाखल केले. डॉक्टरांनी करिश्माला तपासून मयत घोषित केले. या घटनेची माहिती समजताच भुसावळ तालुका पोलिस स्टेशनचे पो.नि. महेश गायकवाड यांनी आपले सहकारी सहायक फौजदार बाळू पाटील, रियाज काझी, हे.कॉ. संजय तायडे यांच्यासह घटनास्थळी धाव घेत पुढील कारवाई आणि तपासाला वेग दिला. हल्लेखोर धर्मेंद्रला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरुद्ध भुसावळ तालुका पोलिस स्टेशनला गु.र.न. २०५/२०२४ भारतीय न्याय संहिता १०३/१, ३५२, ३५१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास डीवायएसपी कृष्णात पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. महेश गायकवाड व त्यांचे सहकारी करत आहेत. (या कथेतील करिश्मा, धर्मेंद्र आणि जितेंद्र ही नावे काल्पनिक आहेत.)

## दोन यारांमध्ये भाग्यश्रीचा कोंडमारा...

आपल्या मित्र मैत्रिणीसोबत ती गप्पा मारत चॅटिंग करीत होती. अशातच तिची ओळख ही इंस्टाग्रामवरील आपला मित्र शरणाप्पा मस्की याच्याबरोबर झाली. दोघांनी ही इंस्टाग्रामवरून चॅटिंग करीत ओळख वाढविली. ओळखीचे रूपांतर दोघांच्या ही प्रेमात झाले. शरणाप्पा याला भाग्यश्री ही आवडत होती. तिची भरगच्च जवानी कुस्करायला मिळावी म्हणून तो तिला बाहेर भेटायला बोलवू लागला. तीला ही त्या गोष्टीची गरज असल्याने ती त्याला भेटायला जावू लागली. त्याच्याकडून आपली शारीरिक सुखाची गरज पुर्ण करून घेऊ लागली. दोघे ही एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले होते. तिची भरगच्च जवानी तो ओरबाडत असताना ती आपल्याला सोडून जावू नये म्हणून तो तिला आपल्या बद्दल खोटेच सांगत होता. खरे तर त्या दोघांचे ते अनैतिक संबंध होते. परंतु तिला साथीदाराची गरज होती म्हणून ती त्याच्या प्रेमात पडली तर त्याला तिच्या जवानीचा उपभोग घ्यायचा असल्याने तो तिच्या नादाला लागलेल होता. दोघांनी ही एकमेकांची ती गरज ओळखली असल्याने दोघे ही या संबंधात होते. नाही तर त्याला तीन मुलाच्या आईची काय गरज होती. परंतु तिची जवानीच अशी होती की तीन मुलांची आई असून ही तिची जवानी फळफळत होती, ओसाडून वाहत होती. फसणाच्या गरासारखी असलेल्य जवानीचा उपभोग घ्यायला शरणाप्पा कुठेच कमी पडत नव्हता. आपण इंजिनियर असून आपले रोजचे उत्पन्न ६ हजार रूपये असून आपली आर्थिक परिस्थीती चांगली आहे. आपल्या घरची शेती असून त्याचे ही ऊसाचे उत्पन्न चांगले मिळते शिवाय आपण अविवाहित असल्याचे ही त्याने तिला सांगितले होते. आपल्या सारख्या विधवेवर आणि तीन मुलाच्या आई असलेल्या बाईवर शरणाप्पा मनापासून प्रेम करीत आहे हे बघून ती ही भारावली होती. त्या दोघांचे प्रेम बहरत फुलत असताना त्याने तिचे नको ते फोटो काढलेले होते. तिच्याबरोबरचे अश्लिल चॅटिंग ही त्याने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटला सेव्ह करून ठेवले होते. अलिकडे भाग्यश्री ही त्याला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवून त्याच्याकडून वेळोवेळी पैशाची मागणी करीत होती. तो ही सुरूवातीला तिला पैसे देत होता. परंतु ज्यावेळी तिची मागणी वाढत गेली त्यावेळी त्याने तिला पैसे देण्यास नकार दिला. तो तिला आपल्याकडे पैसे नाहीत असे सांगून वेळ मारून नेत होता. तो तिला पैसे देत नसल्याने तिने त्याच्याबद्दल तो राहत असलेल्या हिरेमनापुर येथे चौकशी केली. त्यावेळी तिला असे समजले की, तो विवाहित असून तो मजुरीचे काम करीत आहे. त्याच्या घरची परिस्थीती तशी बिकटच आहे. त्याचे दरमहा उत्पन्न हे सहा हजार रूपयाचे आहे. त्याने आपली फसगत केल्याचे तिच्या लक्षात आल्यावर ती त्याच्यापासून लांब राहण्याचा प्रयत्न करू लागली.पण तो तिच्या जवानीला भुलला असल्याने तो तिच्याशी नाते तोडायला तयार नव्हता. ती आता आपल्याला भेटालयला येत नाही,आपल्याशी बोलत नाही, आपल्याला तिने इंस्टाग्राम वर ब्लॉक केल्याचे त्याच्या लक्षात आल्यावर तो तिचे आपल्याकडील तिचे नको त्या अवस्थेतील फोटो तिला दाखवून ब्लॅकमेल करू लागला. यावरून त्या दोघांत भांडण होऊ लागले.

अलिकडे तिने दुसरा प्रियकर इब्राहिमसाब एलीगार याच्याबरोबर संबंध जोडले होते. इब्राहिमसाब हा तिची गरज पुर्ण करीत होता. तिने आपल्याला सोडून दुसऱ्याचा हात धरल्याचे शरणाप्पाच्या लक्षात आल्यावर तो जास्तच तिला त्रास देवू लागला. त्याच्या त्रासाला वैतागलेल्या भाग्यश्रीने प्रियकर इब्राहिमसाब याला घेऊन शरणाप्पाचे गाव हिरेमनापुर गाठून त्याला ताकीद देवून त्याच्याकडून त्याचा मोबाईल ही काढून घेतला होता. त्यातील आपले अश्लिल फोटो आणि चॅटिंग तिने डिलेट केले होते. परंतु शरणाप्पा याने या अगोदरच तिचे ते फोटो आणि चॅटिंग आपल्या दुसऱ्या सोशल मिडियावरील अंकाउटवर सेव्ह करून ठेवले होते. त्या अधारे तो तिला परत परत ब्लॅकमेल करीत होता. दोघांचे एकत्र असणारे फोटो तो वेगवेळया अंकाऊटवर टाकून पोस्ट करीत त्या खाली तो अश्लिल कमेंट करीत होता. ही गोष्ट ज्यावेळी भाग्यश्रीच्या लक्षात आली त्यावेळी तिने त्याला धमकी देवून परत जर माझी बदनामी केलीस तर गाठ माझ्याशी आहे असे सांगितले. परंतु तिच्या धमकीला तो भीक घालत नव्हता. उलट तो तिला तिच्या दुसऱ्या प्रियकराला सोड माझ्याशी नीट वाग.असे सांगत होता. परंतु तिचा दुसरा प्रियकर तिच्या दोन्ही गरजा पुर्ण करीत होता. तिला दमडी देवून चमडी ही वापरत होता. त्यामुळे तिची त्याच्याकडून प्रत्येक गरज पुर्ण होत होती. तशी गरज शरणाप्पा याच्याकडून पुर्ण होणार नव्हती. तो मोलमजुरी करीत असल्याने त्याने तिला फसवले होते. त्यामुळे तिने त्याचा नाद सोडलेला होता. परंतु शरणाप्पा हा तिचा नाद सोडायला तयार नव्हता. तो तिला दिवसे दिवस त्रास देवून ब्लॅकमेल करीत होता. आता तिच्या डोक्यावरून जास्तच पाणी गेले होते. शरणाप्पा हा सांगून ही ऐकत नाही म्हणून तिने दुसरा प्रियकर इब्राहिमसाब एलीगार याच्यासोबत मिळून शरणाप्पाला चांगलाचा धडा शिकविण्याचा निर्णय घेतला. इब्राहिमसाब ही ती सांगेल ती गोष्ट करायला एका पायावर तयार होता. त्या दोघांनी ही शरणाप्पाची पुर्ण माहिती घेतली. तिने डाव करून शरणाप्पाला फोन करून सांगितले की, मला तुझ्याशी संबंध ठेवायचे आहेत मी तुला तुझ्या गावी भेटायला येते. शरणाप्पाला ही तेच पाहिजे असल्याने त्याने आपल्या घरातील लोकांना ती येणार त्या दिवशी आपल्या घरातून बाहेर पाठविले तो घरात एकटाच राहिला. नेमका याचा संधीचा फायदा घेत २९ सप्टेंबर २०२४ रोजी भाग्यश्री ही आपला दुसरा प्रियकर इब्राहिमसाब याच्या दुचाकी गाडीवर हिरेमनापुर येथे गेली. शरणाप्पाच्या घरी जाण्याअगोदर तिने इब्राहिमसाब याला त्याच्या घरापासून थोडे लांब उभे केले. ती एकटीच शरणाप्पाच्या घरी गेली. घरात तो एकटाचा असल्याचे बघून त्याच्याबरोबर प्रेमाचे चाळे करीत त्याला बेडवर नेले. त्याला ही तेच पाहिजे असल्याने तो तिच्याबरोबर बेडवर गेला. बेडवरती त्याच्याबरोबर प्रणयात रंग असताना अचानक तेथे इब्राहिमसाब हा आला. तेथे त्या दोघांनी त्याच्याबरोबर भांडण करीत त्याला मारहाण करायला सुरूवात केली. त्या भांडणात त्या दोघांनी त्याचा गळा जोरात आवळून धरला. त्याला त्यांनी जराही हालचाल करण्याची संधी दिली नाही. त्यावेळी रात्रीचे १० वाजून गेले होते. त्यामुळे शरणाप्पाच्या घरात काय चालले आहे हे सहसा कोणाच्या लक्षात आले नाही. शरणाप्पाचा जागीच मृत्यू झाल्याचे लक्षात आल्यावर त्या दोघांनी त्याचा मृतदेह एका चादरीत गुंडाळला. गुंडाळलेला मृतदेह गाडीवर दोघाच्या मध्ये ठेवून गावाबाहेर नेला. गावाबाहेरील निर्जन जागी त्याचा मृतदेह तेथील पाळापाचोळा गोळा करून गाडीतील पेट्रोलने पेटवून दिला. त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावल्यावर ते दोघे ही तेथून निघून गेले. इकडे शरणाप्पा कोणला काही न सांगता कुठे निघून गेला आहे याची काळजी करू लागले. दोन दिवस वाट बघून शरणाप्पा मस्की हा बेपत्ता असल्याची तक्रार कोष्टगी पोलीस ठाण्यात दिली. पोलीस त्याचा तपास करीत असताना शरणाप्पा याच्या मोबाईल कॉलचे डिटेल्स काढले. तो बेपत्ता असलेल्या दिवशी त्याच्या मोबाईलवर भाग्यश्री डोनी हिचा फोन आल्याचे पोलीसाच्या निदर्शनास आले. त्याचप्रमाणे शरणाप्पा आणि भाग्यश्री या दोघांचे प्रेमसंबंध असल्याची माहिती ही पोलीसांना मिळाली. त्यांनी भाग्यश्री हिचा शोध घेऊन तिला पोलीस स्टेशनला आणून तिच्याकडे शरणाप्पा मस्की याच्या बाबत चौकशी केली असता ती पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होती. तिच्या बोलण्यात विसंगती जाणवत असल्याने पोलीसांनी महिला पोलीसाकरवी बोलते केले असता तिने आपणच दुसऱ्या प्रियकरासोबत शरणाप्पाचा गळा आवळून खून केल्याचे सांगून त्याचा मृतदेह चादरीत गुंडाळून गावाबाहेर नेऊन जाळून टाकल्याचे सांगितले. मयत शरणाप्पा हा आपल्याला ब्लॅमेलीग करीत होता. त्याचे आणि आपले नको त्या अवस्थेतील फोटो तो सोशय मिडियावर टाकून बदनाम करीत असल्याने त्याचा खून केल्याचे तिने कबुल केले. तिने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी तिचा दुसरा प्रियकर इब्राहिबसाब एलीगार याला ही ताब्यात घेतले. त्याने ही आपला गुन्हा कबुल केला. त्या दोघांनी आपला गुन्हा कबुल केल्यावर या घटनेची फिर्याद शरणाप्पा याच्या नातेवाईकाकडून घेण्यात आली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शरणाप्पा शिवाप्पा मस्की (वय ३२) रा. हिरेमनापुर तालुका कोष्टगी जिल्हा कोप्पळ याचा खून करून पुरावा नष्ट केल्या प्रकरणी भाग्यश्री डोनी (वय ३०) तिचा प्रियकर इब्राहिमसाब एलीगार (वय २८) याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा नोंदवून पोलीसांनी त्यांना कोर्टासमोर उभे केले. मा.कोर्टाने त्याची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल जप्त केली. या घटनेचा पुढील तपास कोष्टगी पोलीस करीत आहेत. इंस्टाग्राम या अभासी दुनियेतील प्रेम हे अभासी असल्यासारखेच असते. त्यात कधी कोणाची फसगत होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे आज काल प्रेमाची व्याख्याच बदलून गेली आहे. विवाबाहय संबंध हे टोकाला गेले की त्यातून अशी खूनाची घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून....

## आयुक्तालयातील १९व्या पोलीस ...

मंजूरी मिळाली आहे, असे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी यावेळी सांगितले. लहान मुलांवर लैंगिक अत्याचार होत आहेत. शाळा महाविद्यालयात पोलिसांनी अधिक लक्ष द्यावे, वाढते सायबर गुन्हे लक्षात घेता जनजागृती करावी असे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी यावेळी सांगितले. या नव्या पोलीस ठाण्याजवळील रस्ता रुंद करावा अशी सुचना त्यांनी आयुक्तांना केली. खासदार हेमंत सवरा यांनी देखील यावेळी सायबर गुनह्यांबाबत जनजागृतीची गरज व्यक्त केली. बोळींज पोलीस ठाण्याची अधिसूचना जुलै महिन्यात काढण्यात आली. तेव्हा वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र तेंडुलकर आणि पोलीस उपनिरीक्षक विष्णू वाघमोडे या दोघांची नियुक्ती करण्यात आली होती. जागेचा शोध घेण्यापासून पोलीस ठाण्याची सजावट या दोन अधिकाऱ्यांनी केली. शुक्रवारी उद्घटनानंतर इतर पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. विरार पश्चिम रेल्वे स्थानक परिसर ते संपूर्ण बोळींज, म्हाडा संकुल परिसर, ग्लोबल सिटी, विराट नगर, यशवंत नगर, तिरुपती नगर, गोकुळ टाऊनशिप, वायके नगर, एमबी इस्टेट, नारिंगी गाव, चिखलडोंगरी, मारंबळपाडा हे भाग आता बोळींज पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणार आहे. त्यासाठी पोलीस स्टेशनची अधिकृत हद्द निश्चिती पूर्ण झाली आहे.

## ८ डिसेंबर रोजी वसई विरार पालिका...

पार्टनर असेल. महिलांचा सन्मान वाढविणारे स्त्री भ्रुण हत्या टाळा निसर्ग समतोल टाळा हे मॅरेथॉनचे घोषवाक्य राहील. महानगरात व देशात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडू तयार व्हावे व त्यांचा शारिरीक व मानसिक विकास घडावा या हेतूने मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली जात आहे. पालिकेचा मॅरेथॉन स्पर्धेचा मार्ग जागतिक अखचड या असोसिएशने मंजूर केला आहे. AFI द्वारे राष्ट्रीय स्तराचा दर्जा देण्यात आला आहे. वसई तालुका कला क्रीडा मंडळ, पश्चिम रेल्वे आणि मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस यांचे मोलाचे सहकार्य आहे. यावेळी व्यासपीठावर पंकज ठाकूर, माजी महापौर नारायण मानकर, माजी महापौर प्रविण शेट्टी, कला क्रीडा विकास मंडळाचे प्रकाश वनमाळी, संदेश जाधव, पालिकेचे अतिरीक्त आयुक्त संजय हेरवाडे, माजी नगरसेवक प्रशांत राऊत उपस्थित होते.

## गाव पाटीलकीच्या अन्यायकारक...

मराठा समाजाचे आहेत.या गावातील पाटील कुटुंबीय स्वतःला इतर कुटुंबीयां पेक्षा वरचढ समजत असून त्यातूनच त्यांनी ही निर्बंध सर्वावर लादली आहेत.पूर्वीच्या परंपरा आता लादणे हे कायद्याच्या दृष्टीने, माणुसकीच्या दृष्टीने सुद्धा चुकीचा आहे. संविधानाने सुध्दा समानतेचे तत्त्व मान्य केले आहे, असे असताना पाटीलकीच्या नावाखाली काही ठराविक लोक इतरांवर अन्याय करून बहिष्कृत करत असतील तर हे चुकीचे आहे. त्यांच्या वर गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे, अशी माहिती वंदना शिंदे कार्याध्यक्षा, अंधश्रद्धा निर्मूलन समिती ठाणे जिल्हा यांनी दिली आहे. तर या गावातील नागरिकांच्या तक्रारी आमच्या कार्यालयाकडे आल्या नाहीत परंतु असा प्रकार सुरू असल्या बाबत नुकताच आमच्या कार्यालयाला समजले आहे. असे जर कोणी वागत असेल तर ते चुकीचे आहे. या बाबत संबंधित पोलिस ठाण्या कडून दखल घेण्यात आलेली असून, आम्ही सुध्दा या बाबत लवकरच माहिती घेऊन योग्य ती उचित कार्यवाही आमच्या कार्यालया कडून केली जाईल अशी माहिती तहसीलदार अभिजित खोल यांनी दिली आहे.

## लोकशाही बळकट करण्यासाठी ...

आदिवासी समाजातील विविधतेचे वरदान लाभले आहे. भिल्ल, गोंड-माडिया, कातकरी, कोळी, वारली आणि इतर समाज आपल्या सांस्कृतिक जडणघडणीचा अविभाज्य घटक आहेत. त्यांच्या परंपरा आपली सामाजिक प्रतिष्ठा समृद्ध करतात हा समाज मुख्य प्रवाहात येईल. आपल्या सरकारने पेसा कायदा आणि वन हक्क कायद्याच्या पूर्ण आणि प्रभावी अंमलबजावणीसह आदिवासी समुदायांच्या उत्थानासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. पंचायती राज कायदा आणि पेसा ग्रामसभांना घटनात्मक मान्यता देतात, ज्यामुळे त्यांना जमिनीचा वापर, संसाधन व्यवस्थापन आणि कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीबाबत महत्त्वाचे निर्णय घेता येतात. ग्रामसभांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की सरकारी योजनांचे लाभ - मग ते आरोग्य, शिक्षण, रोजगार, घर किंवा शेती- प्रत्येक पात्र गावकऱ्यापर्यंत पोहोचतील. लोकांचा आवाज म्हणून काम करणाऱ्या ग्रामसभांनी जनजागृती आणि या कल्याणकारी कार्यक्रमांमध्ये प्रवेश सुलभ करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावली पाहिजे. ग्रामसभांना स्वयं-सहायता गट, कौशल्य विकास कार्यक्रम आणि उद्योजकता यांच्याद्वारे आर्थिक सक्षमीकरणाला सक्रियपणे प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहित करतो. विशेषतः ग्रामसभेच्या बैठका आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग महत्त्वाचा आहे. महिला हा ग्रामीण भारताचा कणा आहे आणि कोणत्याही गावाच्या विकासासाठी त्यांचे नेतृत्व आवश्यक आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर पारदर्शकता वाढवू शकतो, सरकारच्या विविध स्तरांमधील संवाद सुधारू शकतो आणि विकास प्रकल्पांचा रीअल-टाइम ट्रॅकिंग करू शकतो. ग्रामसभांना महत्त्वाची माहिती आणि संसाधने कार्यक्षमतेने मिळतील याची खात्री करण्यासाठी गावे डिजिटल पायाभूत सुविधांनी सुसज्ज असणे आवश्यक असल्याचे राज्यपाल के सी राधाकृष्णन यांनी सांगितले. जमीन, पाणी आणि जंगलांसह स्थानिक स्त्रोतांचे शाश्वत व्यवस्थापन हे ग्रामसभांच्या प्राथमिक जबाबदाऱ्यांपैकी एक आहे. संसाधन व्यवस्थापनाची जबाबदारी घेण्यासाठी ग्रामसभांना अधिकार देऊन, आम्ही हे सुनिश्चित करू शकतो की या संसाधनांचा कार्यक्षमतेने वापर केला जाईल आणि भविष्यातील पिढ्यांसाठी जतन केला जाईल. पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम आणि वन संरक्षण उपक्रम यासारख्या उपक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे. नाशिकमध्ये आदिवासी विद्यापीठ निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामध्ये अखखचड प्रमाणे तयार केलेले वैद्यकीय महाविद्यालय, खखढ सारखी अभियांत्रिकी शाळा आणि खखच सारखी व्यवस्थापन शाळा यासारख्या जागतिक दर्जाच्या संस्थांचा समावेश असेल. या उपक्रमामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना सर्वोत्कृष्ट शिक्षण मिळण्याची खात्री होईल, सर्वसमावेशकता आणि उत्कृष्टता या दोन्हींना प्रोत्साहन मिळेल. विकसित भारत हा महामार्ग विकसित गावांमधून जातो. कल्याणकारी योजनांच्या अभिसरणातून आपल्या गावांचा कायापालट करण्यात ग्रामसभांचा मोठा वाटा असल्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी सांगितले. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी जिल्ह्यातील प्रतिष्ठीत नागरीक, उद्योगपती, पत्रकार, खासदार, माजी खासदार, जिल्ह्यातील वरीष्ठ अधिकारी तसेच राजकीय पक्षाचे नेते आणि विविध शिष्ठमंडळ यांच्याशी शासकीय विश्रामगृह, जव्हार येथे संवाद साधला.

## लातूर बाजार समितीवर मनसेचा ...

काहीही प्रयत्न केले नाहीत हे खरोखर दुर्दैव आहे. कॉंग्रेसच्या ताब्यातील लातूर बाजार समिती ही शेतकऱ्यांचे हीत जपणारी नाही तर व्यापाऱ्यांचे हीत जपणारी आहे त्यामुळे येत्या निवडणुकीत यांना त्यांची जागा दाखवून द्या असे यावेळी संतोष नागरगोजे म्हणाले, यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष डॉ.नरसिंह भिकाणे, शिवकुमार नागराळे, संजय राठोड व भागवत शिंदे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ.नरसिंह भिकाणे, जिल्हाध्यक्ष शिवकुमार नागराळे, जिल्हाध्यक्ष संजय राठोड, मनसे शेतकरी सेना राज्य उपाध्यक्ष भागवत शिंदे, मनसे शेतकरी सेना राज्य सचिव भागवत कांदे, मनसे रोजगार स्वयं रोजगार राज्य चिटणीस सचिन सिरसाट, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष पांडुरंग कदम, शहराध्यक्ष मनोज अभंगे, जिल्हा उपाध्यक्ष रवी सूर्यवंशी, जिल्हा उपाध्यक्ष सचिन बिराजदार, जिल्हा सचिव संतोष दाने, जिल्हा सचिव अतिष सूर्यवंशी, जिल्हा सचिव धनराज गिरी, विधानसभा संघटक सतीश जंगाले, औसा विधानसभा संघटक महेश बनसोडे, रेणापूर तालुका अध्यक्ष बाळासाहेब मुंडे, लातूर तालुकाध्यक्ष श्रीनिवास शिंदे, देवनी तालुकाध्यक्ष सोमनाथ कलशेट्टी,औसा तालुकाध्यक्ष मुकेश देशमाने, जळकोट तालुका अध्यक्ष महेश देशमुख, कामगार सेना जिल्हाध्यक्ष अंकुश शिंदे, वाहतूक सेना जिल्हाध्यक्ष वाहिद शेख, रणवीर उमाटे, मनसे महिला सेना जिल्हाध्यक्षा प्रितीताई भगत, मनसे विद्यार्थी सेना जिल्हा संघटक महेश माने, मनसे शेतकरी सेनेचे नेते बालाजी भरबडे, मनसे ता. संघटक महेश काळे पप्पुभाई आकनगिरे, लाला मोहिते, अनिल पांढरे, बळीराम सुडे, अनिल जाधव, जहांगीर शेख, शशिकांत शिंदे, रेणापूर महिला तालुका अध्यक्षा वंदनाताई केंद्रे, श्रीपाल बस्तापुरे, अरुण नांदे, गोविंद चव्हाण, नवनाथ माचवे, गुणवंत लोहार, नागू हिप्परकर, अनंत भिसे, प्रवीण कटारे, बालाजी पवार, बालाजी धोत्रे, सोमनाथ ढोले, जीवन जंगाले, तानाजी गरड, सचिन इगे, महादू इगे, दशरथ कराड, विशाल मुंडे, चेतन चौहान, सुरेश गालफाडे, बाळासाहेब शिंदे, पंकज बैरागी, अनिल सुरवसे, शाम राठोड, दत्ता म्हेत्रे, धनंजय मुंडे, दौलत मुंडे, शमशोद्दीन सय्यद, राम काळे, सोमनाथ ढोणे, नरहरी लहाने, प्रमोद आंबेकर, राहुल चित्ताडे, विठ्ठल चव्हाण यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## पालघर जिल्ह्यातील मानधन तत्वावरील ...

यांच्या नियमित पाठपुराव्यामुळे ही मानधन तत्वावरील भरती प्रक्रिया यशस्वी झाली आहे. या भरतीमुळे जिल्ह्यातील शिक्षकांची कमतरता काही प्रमाणात भरून निघाली असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी याचा निश्चितच फायदा होईल. तसेच शासनाचे मार्गदर्शन प्राप्त करून घेऊन पेसा व अन्य प्रवर्गातील पात्र उमेदवारांची कंत्राटी तत्त्वावरील शिक्षक भरती देखील लवकर केली जाईल असे जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी यावेळी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा शिक्षण समिती सभापती पंकज कोरे यांनी शिक्षकांचे अभिनंदन करून नेमून दिलेल्या शाळेवर प्रामाणिक पणे काम करा, प्रतिपादन केले. यावेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## वसई-विरार महापालिका कार्यक्षेत्रात ...

३) आयुष्मान आरोग्य मंदिर, प्रगतीनगर, नालासोपारा (पूर्व), ४) आयुष्मान आरोग्य मंदिर, कोशिंबे समाज मंदिर, विरार (पूर्व), ५) आयुष्मान आरोग्य मंदिर, बेलीचा पाडा, सातिवली, वसई (पूर्व), ६) आयुष्मान आरोग्य मंदिर, चिंचोटी, सानिया स्टुडीओ जवळ, कामण रोड, वसई (पूर्व), ७) आयुष्मान आरोग्य मंदिर, साई गार्डन, दिवाणमान, वसई (पश्चिम), ८) आयुष्मान आरोग्य मंदिर, उमेळा, नायगाव (पश्चिम) तरी शहरातील सर्व नागरिकांनी आपल्या परिसरातील नजीकच्या आयुष्मान आरोग्य मंदिर व वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे मोफत वैद्यकीय सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

## १६ वर्षांपासून विरारमध्ये रंगतोय ...

झालं आहे अशा मुली त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत एकदा तरी गरबा खेळायला येतात. मंदिराचे ट्रस्टी किरण ठाकूर, प्रशांत नाईक कुंदन भट यांच्या योगदानामुळे महिलांना संधी मिळाली आहे. सुरूवातीपासून सुरेखा कुरकुरे अर्चना जुवाटकर किशोरी सावंत, गांधी, जुई या महिला गरबा यशस्वी होण्यासाठी कार्यरत आहेत.

14 TO 20 OCTOBER 2024 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 10/12/2024 8:50 PM Page 1



# शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी जिल्ह्यातील १ हजार ९९८ सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे सर्वेक्षण



**पालघर/प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील जनतेला शुध्द व सुरक्षित पाणी पुरवठा होण्यासाठी पाण्याची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक आहे. यासाठी स्वच्छता सर्वेक्षणाचे महत्व अनन्य साधारण आहे. या स्वच्छता सर्वेक्षणातून स्त्रोताभोवतीचा परिसर, पाणी पुरवठा संरचना व व्यवस्थापनातील जे काही दोष आढळून येतात त्यांचे निराकरण वेळेत करता येऊन जलजन्य आजारांना, साथींना प्रतिबंध करता येतो. पालघर सर्वेक्षण गुणवत्तापुर्वक झाल्याने जिल्हयातील पावसाळ्यात व पावसाळयानंतर उद्भवणाऱ्या साथींना आळा घालणे शक्य होईल, या करिता पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी हे जलस्त्रोतांचे सर्वेक्षण वेळेत पुर्ण करावे अश्या सुचना देण्यात आल्या आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत प्रत्येक कुटुंबाला नळाने शुद्ध पाणी पुरवठा करण्याचे धोरण शासनाने निश्चित केले आहे. त्याअनुषंगाने जल स्त्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण हे पावसाळ्यापुर्वी न पावसाळ्यानंतार असे वर्षातून दोन वेळा आरोग्य विभागामार्फत केले जाते. पावसाळयानंतर २ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०२४ कालावधीत स्वच्छता सर्वेक्षण मोहिम सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत द्वितीय वैद्यकिय अधिकारी यांचेवर या सर्वेक्षणाची जबाबदारी देण्यात येत आहे. हे अत्यंत वैशिष्टयपुर्ण सर्वेक्षण असून सर्वेक्षणाद्वारे ग्रामपंचायतींना लाल, हिरवे, पिवळे, चंदेरी कार्ड जिल्हयात वितरीत केले जाते. अशी माहिती जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक धनराज पांडे यांनी दिली. तालुका स्तरावर सर्वेक्षण करण्यात येणाऱ्या पाण्याच्या स्त्रोतांची संख्या डहाणू २६७, जव्हार ३५३, मोखाडा २१४, पालघर २७६, तलासरी १३८, वसई ७०, विक्रमगड १९६, वाडा ४८४ असे एकूण १९९८ स्त्रोतांचे सर्वेक्षण करण्या तयेणार आहेत.

**लाल रंगाचे कार्ड देण्याचे निकष**

ज्या ग्रामपंचायतीमध्ये पाणी शुध्दीकरण अनियमीत होते. पाणी स्त्रोताचा परिसर अस्वच्छ आहे, नळ गळती/ वॉल्व गळती आहेत, ग्रामपंचायतीस टिसीएल पावडरचा पुरेशा प्रमाणात व योग्य गुणवत्तेचा साठा उपलब्ध नाही, वर्षभरात जलजन्य साथरोगाचा उद्रेक झालेला आहे अशा ग्रामपंचायतींना स्वच्छता सर्वेक्षणात तिव्र जोखीम म्हणून स्त्रोत निश्चित केलेला असल्यास लाल रंगाचे कार्ड दिले जाते.

**हिरवे कार्ड देण्याचे निकष**

वरील दोष ज्या ग्रामपंचायतीमध्ये आढळून येत नाही त्यांना हिरव्या रंगाचे कार्ड दिले जाते.

**पिवळे रंगाचे कार्ड देण्याचे निकष**

ज्या गावांमध्ये अस्वच्छता आढळून येते तसेच, स्वच्छता सर्वेक्षणात मध्यम जोखीम म्हणून स्त्रोत निश्चित केलेला असल्यास पिवळे रंगाचे कार्ड दिले जाते.

**चंदेरी रंगाचे कार्ड देण्याचे निकष**

सलग पाच वर्ष साथीचा उद्रेक न झालेल्या व पाच वर्ष हिरवे कार्ड मिळालेल्या असे दोन्ही निकष पुर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतीस चंदेरी कार्ड देण्यात येते.

# आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या हस्ते श्री चंडिका मंदिरामध्ये लिप्टचा शुभारंभ



**वसई/प्रतिनिधी**

नायगाव पूर्व जूचंद्र चंद्रपाडा येथील श्री चंडिका देवी मंदिरामध्ये आमदार हितेंद्र ठाकूर यांच्याहस्ते उद्‌वाहक (लिप्ट)चा शुभारंभ करण्यात आला. वसई विरार शहर महानगरपालिकेचे माजी सभापती व नगरसेवक कन्हैया भोईर यांच्या वतीने श्री चंडिका मंदिरात बसविलेल्या उद्‌वाहक (लिप्ट) चे नुतनीकरण व जास्त भार असलेल्या लिप्टचा शुभारंभ आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी या कार्यक्रमासाठी माजी महापौर नारायण मानकर, शंकर नारायण महाविद्यालयाचे संस्थापक रोहिदास पाटील. श्री चंडिका देवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष देवेद्र किणी, उपाध्यक्ष विद्याधर पाटील, माजी अध्यक्ष केदारनाथ पाटील, हरिदर पाटील बहूजन विकास आघाडीचे मोरेश्वर पाटील, सुनिल आचोलकर, विश्वजित पाटील, चेतक पाटील तसेच मंदिर ट्रस्टचे इतर पदाधिकारी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसचांलन मनोहर पाटील यांनी केले. मात्र लिफ्टचा ज्येष्ठ नागरिक व अपंगांना फायदा होणार आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### कौशल गायकर याला कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक



वसई : पालघर जिल्हा कुस्तीगीर संघाचा कुस्तीपटू कैशल दिपक गायकर याने नाशिक भगूर येथे झालेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत पालघर जिल्ह्याला कांस्यपदक मिळवून दिले आहे गायकारच्या या यशाचे पालघर जिल्हा कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष तथा आमदार हितेंद्र ठाकुर, उपाध्यक्ष काशिनाथ पाटील यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्यांनी त्याचे कौतुक केले. कैशल हा वाडा तालुक्यातील गायकर पाडा येथील आहे तो ग्रिको रोमन १५ वर्ष कुमार गट ६२ किलो वजनी गटात कुस्ती स्पर्धेत उतरला होता व त्याने आपल्या डावाची चुणूक कुस्ती मैदानात दाखवली सद्या तो बेळगाव येथील मिलेट्री स्कुलयेथे कुस्तीचे धडे घेत आहे.

### मीरा रोडमध्ये पोलीस कर्मचाऱ्याची आत्महत्या



मिरा-भाईंदर : मिरा रोड मध्ये राहणाऱ्या एका पोलीस कर्मचाऱ्यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली बुधवारी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. सागर अथनीकर (२३) असे या पोलीस शिपायाचे नाव आहे. ते मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील नियंत्रण कक्षात कार्यरत होते. सागर अथनीकर हे आपल्या एका सहकाऱ्यासह मिरा रोड मधील अपना घर या संकुलात राहत होते. रविवारी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास घरात कोणी नसताना सागर यांनी पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. घरगुती वादातून ही आत्महत्या केल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. याप्रकरणी काशिगाव पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे, अशी माहिती काशिगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल पाटील यांनी दिली.

### दुर्गाअष्टमी शुभ मुहूर्तावर महाप्रसादाचे वितरण



अंबरनाथ : पूर्व नगरसेवक किशोर वनवारी यांनी महाप्रसाद कार्यक्रम आयोजित केला होता. सालाबादाप्रमाणे दुर्गा अष्टमी शुभ मुहूर्तावर या वर्षी सुद्धा महाप्रसाद वितरण करण्यात आले.उपस्थित जनतेला ज्यास्तीत ज्यास्त लाभ कसा घेता येईल याकडे लक्ष केंद्रित करण्यात आले. महाप्रसाद घेण्यासाठी अनेक गणमान्य जनता होती. पूर्व नगरसेवक प्रत्येक वर्षी महाप्रसाद वितरणाचा ज्यास्तीत ज्यास्त जनतेला लाभ कसा होईल याकडे ते विशेष लक्षदेतात.आणि माता देवी समोर नतमस्तक होऊन शहरवाशियांवर आणि देशावर कुठलेही संकट येऊनये यासाठी प्रार्थना करीत असतात.विशेष म्हणजे या प्रसादाचा लाभ घेण्यासाठी शहरातील वेगवेगळ्या पक्षाचे राजकीय नेते मंडळी यांनी हजेरी लावली होती. जसे आमदार, शहरप्रमुख, युवाधक्ष, वार्ड अध्यक्ष व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. नेते मंडळीने माता देवी समोर नतमस्तक होऊन सगळ्यांना सुख शांती लाभो, सगळ्यांचे दुःख नष्ट होवो,प्रार्थना करीत प्रसादाचा लाभ घेत, देशवाशियांना दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. आमदार कुमार अयलानी यांनी माता देवीचे दर्शन करून किशोर वनवारी यांना पुढेही माता देवीची अशीच सेवा चालू ठेवावी व वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### पोलिसांनी अडवताच मद्यपी दुचाकी पेटवली



वसई : वसई पश्चिमेच्या सनसिटी येथे मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी पकडल्यानंतर रागाच्या भरात त्याने आपले दुचाकी जाळून टाकली. शिवकुमार नायर असे या तरुणाचे नाव असून त्याला चौकशीसाठी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास नाकाबंदी दरम्यान त्याला पोलिसांनी अडवले होते. त्याने मद्यपान केल्याचे आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी त्याची दुचाकी जप्त केली आणि कागदपत्र घेऊन त्याला दुसऱ्या दिवशी बोलावले होते. संध्याकाळी पाचच्या सुमारास तो आला आणि पोलिसांशी वाद घातला. यावेळी अचानक त्याने आपले दुचाकी पेटवून दिली अशी माहिती वसई वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ निरीक्षक महेश शेटये यांनी दिली.

# पालघर पोलिसांकडून मालमत्ते संदर्भातील तीन गुन्ह्यांचा उकल

## सोन्याचे दागिने व रोख रक्कम मिळून सुमारे एक कोटी ३८ लाखांचा ऐवज जमा



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर पोलिसांनी चोरीचे दोन प्रकार तसेच ज्वेलर्सने ७९ ग्राहकांना गंडा लावून पलायन केल्या प्रकरणात आरोपीला अटक करून बहुतांश मालमत्ता परत मिळवण्यात यश मिळविले आहे. सफाळे येथील गणेश ज्वेलर्स या नावाने सोन्या चांदीचे दागिने बनवणाऱ्या भागीदारी व्यवसायातील दोन इसमांनी जानेवारी २०२२ ते एप्रिल २०२४ दरम्यान सफाळे परिसरातील ७९ ग्राहकांना दागिने बनविणे, दुरुस्ती करणे या कामी जुने सोन्याचे दागिने व रोख रक्कम मिळून सुमारे एक कोटी ३८ लाख रुपयांचे ऐवज जमा केला होता.

या गुन्ह्यामध्ये एक आरोपी पोलिसांनी मे २०२३ मध्ये अटक केली असली तरीही कानाराम चौधरी हा आरोपी फरार होता. स्थानिक गुन्हे शाखेचे नव्याने पदभार सांभाळाने प्रदीप पाटील व सहकाऱ्यांनी सुमारे दीड वर्ष फरार असणाऱ्या आरोपीला इंदोर येथे ताब्यात घेऊन सुमारे १७ लाख ७१ हजार रुपयांचा सोन्याचे दागिने व रोख रक्कम हस्तगत केली आहे. या प्रकरणातील ३९ तक्रारींचे निवारण झाले असून इतर प्रकरणात दागिन्यांची मूळ किंमत याची समेट घालण्याचे काम सुरू असल्याची माहिती पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी पत्रकारांना दिली. २४ सप्टेंबर रोजी पालघर येथील हॉटेल साई रेसिडेन्सी परिसरात घरफोडी करून सुमारे २१ हजार रुपये किमतीची सोन्याची गंठण व रोख रक्कम चोरी करणाऱ्या भिवंडी येथील रहिवासी असणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला पालघर पोलीसांनी जुचंद्र येथून अटक केली आहे. त्याच्याकडून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून हा गुन्हेगार इतर १७ मालमत्त्यांच्या गुन्ह्यामध्ये सहभागी असल्याची पोलिसां समोर कबुली दिली आहे. २८ सप्टेंबर रोजी पालघर येथे झालेल्या अन्य एका गुन्हा मध्ये पालघर बायपास मार्गावर इन्स्टाकार्ट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड या कार्यालयात चोरी करून २० मोबाईल, पावर बँक असे सुमारे पाच लाख १६ हजार रुपयांच्या मोबाईल व संबंधित इतर वस्तू चोरी करणाऱ्या एका आरोपीला पालघर तालुक्यातील बिरवाडी येथून अटक केली आहे. या आरोपींनी चोरलेले मोबाईल हँडसेट, पावर बँक जमिनीत लपवून ठेवल्याचे माहिती मिळाल्यानंतर मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी पत्रकार परिषदेत दिली.

# यंग स्टार ट्रस्टच्या ज्येष्ठांसाठीच्या निबंध स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**विरार/प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिकांसाठी यंगस्टार्स ट्रस्टने निबंध स्पर्धेचे आयोजन जुन्या विवा महाविद्यालयात केले होते. वसई विरार नालासोपारा येथिल ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते. आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व समन्वयक अजीव पाटील यांच्या सहकार्याने निबंध स्पर्धा पार पडली. ज्येष्ठ नागरिकांचे एकटेपण आणि त्यावर उपाय, कौटुंबिक जीवनात जेष्ठ नागरिकांची भूमिका, ज्येष्ठ नागरिकांचे तंत्रज्ञानाशी नाते, ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक संस्थेचे महत्त्व, ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य आणि त्यांची काळजी असे विषय देण्यात आले होते. शाळेत बोर्ड परिक्षेला जसे विद्यार्थी पेपर लिहीतात तसे एकाग्रत चित्ताने सर्व जेष्ठ विद्यार्थी निबंध लिहीत होते. सर्वांना पुन्हा शाळेची आठवण झाली. या निबंध स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दिवाळी पहाट गुरूवार दि. ३१ ऑक्टोबरला होणार आहे तरी सर्व जेष्ठ नागरिकांनी त्या दिवशी उपस्थित रहावे. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुग्धा लेले, मिलिंद पोंक्षे, सुरेखा कुरकुरे, भूषण चुरी यांनी मेहनत घेतली.

### श्री वेताळेश्वर शिक्षण संकुलमध्ये दांडिया नाईट संपन्न



**औसा/प्रतिनिधी**

येथील श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी लातूर, कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लातूर कॉलेज ऑफ नर्सिंग, राजीव गांधी इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटेक्निक लातूर, लातूर कॉलेज ऑफ सायन्स यांच्या संयुक्त विद्यमानाने नवरात्र महोत्सव निमित्ताने दांडिया नाईट आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे ब्युटिशियन अश्विनी रनखांबे यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली .सोबत संचालिका सौ माधुरी बावगे, प्राचार्य डॉ श्रीनिवास बुमरेला, प्राचार्य डॉ.वीरेंद्र मेश्राम प्रभारी प्राचार्या क्षितिजा माळी उपस्थित होते. या दांडिया नाईट कार्यक्रमामधून बेस्ट ग्रुप डान्स, बेस्ट कपल डान्स, बेस्ट गेटप मुली व मुलांमधून प्रथम क्रमांक काढून रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्रचे वितरण करण्यात आले.तसेच प्रमुख उपस्थिती संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, सोनवरे सर, शुभम वैरागकर आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी होते.

# शिवसेना (उबाठा) वाडा तालुका कार्यकर्ता मेळावा उत्साहात संपन्न



**वाडा/प्रतिनिधी**

शिवसेना (उबाठा) वाडा तालुक्याचा कार्यकर्ता मेळावा उत्साहात पार पडला, शिवसरनेचे पदाधिकरी प्रकाश केणे यांच्या निवास स्थानी भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. तालुकयातील पक्ष संघटना वाढीसाठी, आगामी होणाऱ्या विधानसभेच्या दृष्टीने पुर्वतयारी व पक्षात होणारे पक्षप्रवेश या उद्देशाने सदर कार्यकर्ता मेळावा आयोजीत करण्यात आला होता. सदर मेळावा शिवसेना उपनेत्या ज्योतीताई ठाकरे, भिवंडी सहसंपर्कप्रमुख सोन्याशेठ पाटील , पालघर सहसंपर्कप्रमुख निलेश गंधे, पालघर जिल्हाप्रमुख अनुप पाटील, भिवंडी लोकसभा सल्लागार अरूण पाटील व विस्तारक गणेश राऊत ,पालघर जिल्हासंघटक अंजलीताई चोधरी व पालघर सहसमन्वयक गोविंद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. सदर मेळाव्यास उपस्थित प्रमुख पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. या वेळी जेष्ठ शिवसैनिक, महीला सदस्य, शिवसेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व शिवसैनिकानी, यूवासैनिकांनी चांगलीच गर्दी केली होती. या मेळाव्यात जेष्ठ शिवसैनिक व कृषीभुषण अनिल पाटील यांचा सुद्धा तालुक्याच्या वतीने सन्मान करणयात आला, त्याचबरोबर कुडूस येथील एका रूग्णालयाला विनामुल्य व्हेटीलेटर भेट देण्यात आले. यावेळी सुमारे २०० जणांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला, उपस्थीत मान्यवराच्या हस्ते त्यांचे शिवबंधन, भगवा पटका व झेंडे हातात देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी महीला आघाडीच्या वतीने महीलांना पदनियुक्तीची पत्र उपनेत्या ज्योती ठाकरे यांच्या हस्ते देण्यात आली. कार्यकर्ता मेळाव्याचे प्रस्ताविक तालुकाप्रमुख निलेश सिताराम पाटील यांनी केले, याप्रसंगी जेष्ठ शिवसैनिक डि.व्ही. पाटील, शहरसंघटक वर्षा गोळे, माजी नगराध्यक्षा गिताजंली कोलेकर, जिल्हा संघटक अंजली चौधरी, शहापुर विस्तारक गणेश राऊत, सहसमन्वयक गोविंद पाटील, लोकसभा सल्लागार अरूण पाटील, सहसंपर्कप्रमुख निलेश गंधे व उपनेत्या ज्योती ठाकरे आदी मान्यवरांनी उपस्थीत कार्यकर्त्यांनां संघटनेच्या आगामी वाटचालीसंदर्भात मार्गदर्शन केले. सदर मेळाव्यास उपजिल्हाप्रमुख दिलीप देसाई, विधानसभा संघटक मनाली फोडसे, पंचायत समीतीच्या सभापती अस्मिता लहांगे आदी उप्सथित होते. सदर कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन उपजिल्हाप्रमुख प्रकाश केणे, तालुकाप्रमुख निलेश पाटील व शहरप्रमुख प्रमोद घोलप यांनी केले होते. हा मेळावा यशस्वी होण्यासाठी तालुक्यातील पदाधिकारी, शहरातील पदाधिकारी, शिवसैनिक व युवासैनिकांनी चांगलीच मेहनत घेतली.

# पद्मश्री कै.भाऊसाहेब वर्तक यांच्या पुण्यतिथीनिमित्त विरार येथे राष्ट्रीय पातळीवरील परिषद संपन्न

**विरार/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल मंत्री तथा आगाशी विरार शिक्षण संस्थेचे संस्थापक कै. पद्मश्री भाऊसाहेब वर्तक यांच्या पुण्यतिथीनिमित्त विरार पूर्व येथील पद्मश्री भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय आणि महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने अलीकडील संशोधनातील बहुआयामी ट्रेंड या विषयावरती राष्ट्रीय पातळीवरील परिषद आयोजित केली होती.




सदर परिषदेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून विरार पश्चिम येथील सेंट जोसेफ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुभाष डिसोजा सर प्रमुख उपस्थित होते. सन्माननीय अतिथी म्हणून संस्थेच्या शालेय समिती अध्यक्षा सौ. प्राची बगे मॅडम उपस्थित होत्या. छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित अजंठा प्रकाशनाचे प्रकाशक डॉ. विनय हाटोळे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी दीप प्रज्वलन करून कै. अण्णासाहेब वर्तक, पद्मश्री भाऊसाहेब वर्तक, तारामाई वर्तक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पवित्र स्मृतीस अभिवादन केले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भाऊ साहेबांना समर्पित केलेले कृतज्ञता गीत उपस्थितांसमोर सादर करून भाऊसाहेबांच्या स्मृतीस उजाळा दिला. मान्यवरांनी राष्ट्रीय परिषदेचे डिजिटल उद्‌घाटन करून उद्‌घाटन झाल्याचे जाहीर केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शितल कोरडकर आणि कॉमर्स विभाग प्रमुख डॉ. ध्रुवाली वर्तक यांनी मान्यवरांचे रोप देऊन स्वागत केले. प्राचार्यांच्या उद्घाटन प्रसंगी भाषणानंतर सर्वच मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि राष्ट्रीय परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र आणि विविध राज्यातील एकूण ४५ संशोधकांनी आपले संशोधन निबंध या परिषदेत सादर करून प्रकाशन पुस्तकात प्रकाशित केले. सर्व सहभागींना प्रकाशन पुस्तक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक निखिल नाईक यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळाचे विशेष सहकार्य लाभले.

14 TO 20 OCTOBER 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 10/12/2024 8:50 PM Page 1



# आयुक्तालयातील १९व्या पोलीस ठाण्याची निर्मिती बोळींज पोलीस ठाण्याचे गृहमंत्र्यांच्या हस्ते उदघाटन






**विरार/प्रतिनिधी**

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील बोळींज या १९ व्या पोलीस ठाण्याचे उदघाटन शुक्रवारी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दुरदृष्यप्रणालीद्वारे झाले. अर्नाळा सागरी आणि विरार पोलीस ठाण्याचे विभाजन करून हे पोलीस ठाणे तयार करण्यात आले आहे. मीरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना १ ऑक्टोबर २०२० रोजी झाली होती. नव्या आयुक्तालयात एकूण २० पोलीस ठाण्याची रचना करून शहरात ३ परिमंडळे तयार करण्यात आली होती. वसई विरार शहरात मांडवी, पेल्हार, बोळींज, आचोळे आणि नायगाव तर मिरा भाईंदर मध्ये काशिगाव आदी ६ नवीन पोलीस ठाणे प्रस्तावित करण्यात आली होती. यापैकी आचोळे, पेल्हार, मांडवी, नायगाव आणि काशिगाव ही ५ पोलीस ठाणी तयार झाली होती. परंतु बोळींज पोलीस ठाणे जागेअभावी रखलडले होते. अखेर जुलै महिन्यात बोळींज पोलीस ठाण्याची अधिसूचना काढण्यात आली आणि विरार पश्चिमेच्या म्हाडा येथील इमारतीत पोलीस ठाण्याला जागा देण्यात आली. मागील साडेतीन महिन्यात पोलीस ठाण्याच्या निर्मितीचे काम पूर्ण करण्यात आले. राजेंद्र तेंडुलकर यांची वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. शुक्रवारी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुण्याहून दुरदृश्यप्रणालीद्वारे या पोलीस ठाण्याचे उद्धटन केले. यावेळी विरार मध्ये आयोजित कार्यक्रमात वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर, खासदार हेमंत सवरा, आयुक्त मधुकर पांडे, पालिका आयुक्त अनिलकुमार पवार, अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे, पोलीस उपायुक्त जयंत बजबळे, पुर्णीमी श्रींगी-चौगुले आदी उपस्थित होते. यावेळी नालासोपाऱ्याच्या सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या नवीन इमारतीचे देखील उद्धघाटन करण्यात आले. पोलीस आयुक्तालय सुरू झाले तेव्हा २ हजार पदे होती. मागील वर्षी १ हजार पदे भरली आहेत. नुकताच १ हजार ०८२ पदांना ...पान ६ वर

# गाव पाटीलकीच्या अन्यायकारक निर्णया विरोधात ग्रामस्थ आक्रमक



**भिवंडी/प्रतिनिधी**

महाराष्ट्रामध्ये जातपंचायतीच्या जाचक नियम आणि कायद्यांना बंदी घालण्यात आलेले आहे परंतु असं असले तरी सुद्धा भिवंडी तालुक्यात कोयना पुनर्वसनग्रस्तांचे पुनर्वसन केलेल्या गावांमधून आजही पाटीलकी अस्तित्वात असून तेथे पाटीलकी विरोधात वागणाऱ्यांवर दंडात्मक तसेच वाळीत टाकण्याचे बहिष्कृत करण्याची कारवाई केली जाते.कोयना प्रकल्पामुळे बाधित झालेल्या पन्नासहून अधिक गावांचे ठाणे पालघर रायगड या जिल्ह्यांमध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे. भिवंडी तालुक्यात तब्बल तेरा गावांमधून या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यात आलेला आहे.कुसापुर मोरणी येथे गावकीचे श्री कासाई मानाई जानाई हे ग्रामदैवत मंदिर असून या मंदिरामध्ये पूर्वपार फक्त पाटील कुटुंबीय हेच पूजा करीत आले आहेत. गावातील पाटील कुटुंबीयां व्यतिरिक्त इतर पुनर्वसनग्रस्त ग्रामस्थांना,स्त्रियांना या मंदिराच्या गाभाऱ्यात जाण्यास मनाई असून, कोणताही धार्मिक कार्यक्रम या मंदिरात साजरा करता येत नाही. या विरोधात गावातील ग्रामस्थ रामचंद्र शेलार यांनी मागील कित्येक वर्षापासून आवाज उठवला आहे. मुख्यमंत्री, सामाजिक न्याय विभाग जिल्हाधिकारी यांच्याकडे अनेक तक्रार करून ही न्याय न मिळाल्याने गणेशपुरी पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदवली आहे, अशी माहिती रामचंद्र शेलार तक्रारदार यांनी दिली आहे. कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन या कुसापूर गावात केलेला आहे.या ठिकाणी असलेले सर्व ६० कुटुंबीय शेलार या आडनावाचे कुटुंबातले खास करून ...पान ६ वर

# ८ डिसेंबर रोजी वसई विरार पालिका १२वी मॅरेथॉन स्पर्धा!




**विरार/प्रतिनिधी**

यंदा ८ डिसेंबर रोजी वसई विरार शहर महानगर पालिका आयोजित १२ वी मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेची सर्व माहिती आयुक्त अनिलकुमार पवार यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. सहआयोजक वसई तालुका कला क्रीडा विकास मंडळ राहणार आहे. यंदाच्या मॅरेथॉन स्पर्धेत काही नवीन स्पर्धा तसेच आयोजनासंबंधी नवी माहिती पत्रकारांना देण्यात आली. पूर्ण मॅरेथॉन, अर्ध मॅरेथॉन तसेच १० किलोमीटर व ५ किलोमीटर अशा स्पर्धा घेतल्या जातील. या स्पर्धांचे शुल्क ८५०/-रुपये अधिक कर असे आकारले असून नवीन वयोगटात वृद्ध आणि ज्येष्ठ नागरीकांना निरोगी राहण्यासाठी धावण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. या स्पर्धेत तीन वयोगटातील नागरीकांचा सहभाग निश्चित केला आहे. महिलांसाठी पूर्ण मॅरेथॉनमध्ये २५ व त्यावरील वयोगट असा आहे. १० किलोमीटर आणि ५ किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेत ६० वर्षावरील पुरुष आणि महिला भाग घेतील. यासाठी पालिकेच्या वेबसाईटवर (vvmm.in) प्रसिद्ध करण्यात आली आहे. अर्ध मॅरेथॉन स्पर्धेमध्ये हौशी धावपटूंकरीता बॅटल रन सुरु करण्यात येत आहे असे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले. ही स्पर्धा रनिंग क्लबसाठी आहे. या स्पर्धेला ३ लाख रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. अर्धे मॅरेथॉन स्पर्धेमध्ये चार सदस्यांचा एक संघ करुन सहभाग नोंदवता येऊ शकतो. या चार जणांमध्ये फक्त एक महिला धावपटू व एक २५ वर्षाखालील धावपटू असेल.

हौशी धावपटूंसाठी बॅटल रन महिलांसाठी खुली असेल. या स्पर्धेची वेळ १ तास ३५ मिनिटे असेल. या स्पर्धेसाठी फास्ट अॅन्ड अॅप हे एनर्जी पार्टनर असेल तर विरारमधील अत्याधुनिक प्रकृती हॉस्पिटल हे स्पर्धेचे मेडिकल पार्टनर असेल. सर्व स्पर्धकांना हे रुग्णालय वैद्यकीय सेवा पुरवेल. नवीन विवा कॉलेज व्हेन्यू पार्टनर म्हणून कायम आहे तर आर्ट मिडिया आऊटडोअर ...पान ६ वर

# लोकशाही बळकट करण्यासाठी ग्रामसभेचे मोठे योगदान -राज्यपाल




**पालघर/प्रतिनिधी**

ग्रामसभा ही केवळ गावकऱ्यांची सभा नसून लोकशाहीचे उत्तम उदाहरण आहे. लोकशाही बळकट करण्यासठी ग्रामसभेचे मोठे योगदान असल्याचे राज्यपाल सी. पी राधाकृष्णन यांनी सांगितले. जव्हार येथे ग्रामसभा महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते त्या वेळी राज्यपाल के.सी. राधाकृष्णन बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार डॉ. हेमंत सवरा, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी करिष्मा नायर, सत्यम गांधी, वयम संस्थेचे अध्यक्ष विनायक थळकर, विश्वस्त मिलिंद थत्ते, ग्रामसभेच्या अध्यक्षा संगिता. कुवारा, तसेच नागरिक उपस्थित होते. ग्रामसभा ही एक छोटी लोकसभा आहे जिथे लोकांचे प्रश्न, समस्या ऐकल्या जातात, जिथे समाजाच्या हिताचे निर्णय घेतले जातात आणि जिथे खऱ्या अर्थाने लोक कारभार केला जातो ग्रामसभांना सक्षम बनवण्यात आणि आपल्या ग्रामीण भागातील प्रशासन हा विकासाचा खरा पाया ठरेल असा विश्वास राज्यपाल राधाकृष्णन यांनी व्यक्त केला. आपल्या देशाच्या प्रगतीसाठी, ग्रामसभांना सक्षम, बळकट आणि नेतृत्व करण्यास सुसज्ज केले पाहिजे. समृद्ध भारत आणि आत्मनिर्भर भारताची संकल्पना साकार करण्यासाठी ग्रामसभांचे सक्षमीकरण महत्त्वाचे असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली केंद्र सरकार आपल्या गावांचा आणि आपल्या आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कटिबद्ध आहे. महाराष्ट्र राज्याला ...पान ६ वर

# राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांचेमार्फत जनजागृती कार्यक्रम



**वसई/प्रतिनिधी**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांचेमार्फत जन जागृती कार्यक्रम वसई येथील न्यु इंग्लिश स्कूल, वसई व एम.जी.परुळेकर विद्यालय, वसई येथे संपन्न झाला.

यावेळी नैसर्गिक आपत्ती आल्यावर क़ाय दक्षता घ्याव्यात तसेच काय उपाय योजना कराव्यात याची प्रात्यक्षिके व माहिती विद्यार्थ्यांना सादर करण्यात आली. नैसर्गिक आपत्ती व मानव निर्मित आपत्ती कुठल्याही क्षणी उद्भवते. मागील काही वर्षांमध्ये याचा अनेकदा प्रत्यय आलेला आहे. नागरिकांना याचे प्रशिक्षण नसल्यामुळे अनेकदा जीवित, वित्तहानी झालेली आहे. भविष्यात अशा घटना घडल्यानंतर घेण्यात येणारी आवश्यक काळजी, सूचना यावेळी उपस्थितांना देण्यात आली. दिनांक ७ ते १६ ऑक्टोबर या कालावधीत जन जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानुसार, पालघर जिल्ह्यात विविध ठिकाणी अश्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे यांनी सदर बाबतचे आदेश पारित केलेले होते. नायब तहसिलदार शशिकांत नाचण, निरीक्षक सुरेन्द्र पुनिया एफ यांनी विद्यार्थ्यांना यावेळी मार्गदर्शन केले. न्यू इंग्लिश स्कूल शाळेच्या प्राचार्या शोभना वाझ, एम.जी.परुळेकर शाळेच्या प्राचार्य अंजली मेनन मंडळ अधिकारी सुनील राठोड, नाटेकर, शिक्षक वृंद उपस्थित होते. वेळी विविध प्रात्यक्षिके दाखविणेत आली.

# लातूर बाजार समितीवर मनसेचा 'रूमणे मोर्चा'




**लातूर/प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सोयाबीन, मूग या शेतीमालाची खरेदी-विक्री हमीभावानुसारच करण्यात यावी तसेच पोटली, पायली, सॅम्पल, मातेर व विनाकारणचा ईतर खर्च या शेतकऱ्यांना लुटणाऱ्या अनिष्ट प्रथा कायमस्वरूपी बंद करण्यात याव्यात, तसेच नवीन सोयाबीनची आर्द्रता (हवा) ही नियमानुसार १२ च्या पुढे मोजली जाणे आवश्यक असतानाही ती जास्तीची २ किलो कडती मिळावी यासाठी १० च्या पुढून मोजली जाते हा प्रकार तात्काळ बंद करावा. तसेचआर्द्रता (हवा) मोजताना २०० ग्राम च्या मापाने सोयाबीन हळुवारपणे आर्द्रता मोजण्याच्या मशीनमध्ये टाकल्यास जेवढे आहे तेवढीच आर्द्रता मशीनमध्ये दाखवली जाते परंतु लातूर बाजार समितीमध्ये कुठलेही २०० ग्राम चे माप न वापरता २०० ग्राम पेक्षा जास्त सोयाबीन उंचावरून आदळून आर्द्रता मोजणाऱ्या मशीनमध्ये टाकले जाते त्यामुळे आर्द्रता (हवा) खरी आहे त्यापेक्षा जास्त दाखवली जाते. अशाप्रकारे आर्द्रता मोजतानाही शेतकऱ्यांची लूट होत आहे. ही लूट सुद्धा तात्काळ थांबवण्यात यावी या मागण्यासाठी मनसेच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती लातूर वर हजारो शेतकऱ्यांसह मनसे शेतकरी सेना अध्यक्ष संतोष नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली 'रूमणे मोर्चा' काढण्यात आला. यावेळी आम्हाला शेतकऱ्यांना लुटणाऱ्या सर्वच अनिष्ट प्रथा बंद करण्याचे लेखी द्या अन्यथा सोबत आणलेल्या रूमण्याने बाजार समिती फोडू अशी भूमिका मनसेने घेवून बाजार समितीसमोर भर पावसात मोर्चेकऱ्यांनी ठिय्या मांडला. त्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव अरविंद पाटील यांनी उद्यापासून लातूर बाजार समितीमधील सर्वच अनिष्ट प्रथा आम्ही बंद करू व व्यापाऱ्यांनी प्रथा बंद नाही केल्यास त्याच्यावर गुन्हे दाखल करू असे लेखी पत्र दिले. यावेळी बोलताना संतोष नागरगोजे म्हणाले की गेल्या ५० वर्षांपासून बाजार समिती काँग्रेसच्या ताब्यात आहे. परंतु काँग्रेसच्या आमदार व सभापती यांनी शेतकऱ्यांची पोटली, पायली, सॅम्पल, मातेर व ईतर खर्चाच्या नावाखाली शेतकऱ्यांची होत असलेली लूट थांबवण्यासाठी ...पान ६ वर

# पालघर जिल्ह्यातील मानधन तत्वावरील ८२१ शिक्षकांची नियुक्ती आदेश वाटप




**पालघर/प्रतिनिधी**

अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) १७ संवर्गातील शिक्षक या संवर्गाची ५ ऑक्टोबर २०२४ च्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णयानुसार पेसा क्षेत्रातील रिक्त पदांवर मानधन तत्वावरील नियुक्त शिक्षकांना आज जिल्हा परिषद पालघर येथे नियुक्ती आदेश वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, शिक्षणाधिकारी प्राथमिक सोनाली मातेकर, यांच्या प्रमुख उपस्थितीत आज हे आदेश देण्यात आले असून सदर शिक्षक आज नेमून दिलेल्या शाळेवर हजर झाले. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या अंतिम निर्णयास अधीन राहून हे आदेश देण्यात आले. गेल्या वर्षभापासून प्रलंबित असलेली ही शिक्षक भरतीची प्रक्रिया पूर्ण झाली असून जिल्हा परिषद अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उपाध्यक्ष, सर्व समिती सभापती ...पान ६ वर

# वसई-विरार महापालिका कार्यक्षेत्रात आयुष्मान आरोग्य मंदिर व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखान्या'चे लोकार्पण




**वसई/प्रतिनिधी**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये १५ वा वित्त आयोगाअंतर्गत महानगरपालिकेमार्फत ५५ आयुष्मान आरोग्य मंदिर व राज्य शासनाने १५ वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वित करण्याचे लक्ष्य दिलेले आहे. दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी ०७ आयुष्मान आरोग्य मंदिर व ०१ वं. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यांचे स्थानिक लोकप्रतिनिधी, मान्यवर नागरिक व महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. महानगरपालिकेमार्फत आतापर्यंत एकूण २६ आयुष्मान आरोग्य मंदिर व १५वं. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना नागरिकांना वैद्यकीय सुविधा देणेसाठी कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. महानगरपालिकेला दिलेल्या लक्ष्यापैकी आतापर्यंत १५ वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यान्वित करणेचे लक्ष्य महानगरपालिकेने पूर्ण केले असून उर्वरित आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यान्वित करण्याचे लक्ष्य लवकरच महापालिकेमार्फत पूर्ण करण्यात येईल. दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी लोकार्पण करण्यात आलेली आयुष्मान आरोग्य मंदिर व वं. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाची ठिकाणे पुढील प्रमाणे आहेत. १) वं.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, वेदांत टॉवर, आंबावाडी रोड, तुळींज, नालासोपारा (पूर्व), २) आयुष्मान आरोग्य मंदिर, जे.पी.नगर, विरार (पश्चिम), ...पान ६ वर

# १६ वर्षांपासून विरारमध्ये रंगतोय महिलांसाठी खास गरबा!




**विरार/प्रतिनिधी**

नवरात्र म्हटले कि रात्री गरबा हा आलाच. एरवी महिला आणि पुरुष असा एकत्र गरबा आपण बघतो. परंतु गेल्या सोळा वर्षांपासून विरार मधील मंगलमुर्ती मंदिरात खास महिलांसाठी रास गरबा आयोजित केला जातो. महिला व मुली मोठ्या प्रमाणात सहभागी होतात. यंदाच सतराव वर्ष आहे. खरं तर ही संकल्पना माजी स्थायी समिती सभापती अजित पाटील यांची होती. दहा बारा महिलांची मिटिग घेतली महिलांना फ्री असणारा वेळ ठरवण्यात आला. कसा प्रतिसाद मिळतो त्यावेळेस माहित नव्हता एक प्रयोग होता आणि ही संकल्पना आज आपल्याला यशस्वी होतांना दिसते. येणाऱ्या महिलांना व कॉलेज च्या मुलींना बिनधास्त पणे गरबा खेळता येतो.फॅन्सी ड्रेस स्पर्धा, थाली सजावट स्पर्धेच आयोजन केले जाते. रोज बक्षिसाची लयलूट करून आणि लकी ड्रॉ सुद्धा काढला जातो. बऱ्याच महिला गरबा याठिकाणी शिकतात. ज्या मुलींची लग्न ...पान ६ वर